


दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार
संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २७२ | किंमत : २ रूपये

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
**- आजच संपर्क करा -**
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# परीक्षेच्या ताणापायी राज्यात ७ महिन्यांत ६०१ आत्महत्या

**वृत्तसंस्था, पुणे**
गुण किती मिळाले? या एका प्रश्नाभोवती विद्यार्थ्यांचे भविष्य, पालकांच्या अपेक्षा आणि करिअरची चिंता गुरफटत चालली आहे. पुण्यासारख्या शिक्षणनगरीत तरुण आणि विद्यार्थ्यांशी संबंधित आत्महत्यांच्या घटनांनी ही गंभीर बाब पुन्हा ऐरणीवर आणली आहे. परीक्षा, प्रवेश, करिअरची स्पर्धा, कौटुंबिक प्रश्न, मानसिक अस्वस्थता आणि सामाजिक दबाव अशा अनेक घटकांचा ताण तरुणांच्या मानसिक आरोग्यावर पडत आहे.



पुणे पोलिसांच्या आकडेवारीनुसार शहरात २०२३ मध्ये गुन्हे दाखल असलेल्या व अकस्मात मृत्यू म्हणून नोंद असलेल्या १,००४ आत्महतेच्या घटनांची नोंद आहे. २०२४ मध्ये ९७८, २०२५ मध्ये १०६७ घटनांची नोंदविल्या गेल्या आहेत. जानेवारी ते जूलै २०२६ या सात महिन्यांत शहरात ६०१ आत्महत्यांची नोंद झाली. त्यात ४२३ पुरुष आणि ११८ महिलांचा समावेश आहे. बुधवारी (दि. ९) एकाच दिवशी दोन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या वेगवेगळ्या घटना समोर आल्याने तरुण आणि विद्यार्थ्यांशी संबंधित घटनांनी चिंता वाढवली आहे. शहरात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या धाराशिवच्या २९ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची धक्कदायक घटना समोर आली.

प्रथमेश देशमुख असे त्याचे नाव आहे. स्पर्धा परीक्षेतील वारंवार अपयश, आर्थिक अडचणी, शेतीचे नुकसान आणि कर्जाचा वाढता ताणामुळे मानसिक तणावात त्याने टोकाचे पाऊल उचलल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.

दुसऱ्या घटनेत कात्रज परिसरात वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या २१ वर्षीय आदी माया शेखर रेड्डी (रा. मूळ तिरूमलंगरी, हैद्राबाद, तेलंगणा) विद्यार्थ्यीनीने दहाव्या मजल्यावरून उडी मारत जीवन संपवल्याची माहिती समोर आली आहे. एकाच दिवशी घडलेल्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या दोन घटनांनी शैक्षणिक क्षेत्रातील वातावरण ढवळून निघाले आहे. यापूर्वीही अपेक्षित गुण न मिळाल्याने विद्यार्थ्यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटनाही समोर आल्या आहेत. त्यामुळे परीक्षा आणि करिअरचा ताण हा तरुणांच्या मानसिक आरोग्याचा महत्त्वाचा संभाव्य घटक म्हणून चर्चेत आला आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्याची किंमत एका परीक्षेच्या निकालापेक्षा कितीतरी मोठी आहे. त्यामुळे गुणांच्या स्पर्धेपेक्षा संवाद आणि मानसिक आधाराला प्राधान्य देण्याची वेळ आली आहे.

### पालकांनी संवाद वाढविण्याची गरज
विद्यार्थ्यांच्या वर्तनात अचानक बदल, सतत निराशा, एकटेपणा, अभ्यासातील रस कमी होणे, झोप-भुकेतील बदल किंवा भविष्यासंदर्भात तीव्र नकारात्मकता दिसल्यास ते दुर्लक्षित करू नये. अशा वेळी किती गुण मिळाले? यापेक्षा तुला कसे वाटते? हा प्रश्न विचारण्याची गरज आहे. वेळेवर समुपदेशन आणि मानसिक आरोग्य तज्ज्ञांची मदत मिळणे महत्त्वाचे आहे.

### गुण कमी म्हणजे आयुष्य संपले ही मानसिकता धोक्याची
विद्यार्थ्यांसाठी परीक्षा ही आयुष्याचा एक टप्पा आहे; अंतिम निर्णय नाही. मात्र, पालकांच्या अपेक्षा, सातत्याने होणारी तुलना, प्रवेशासाठीची तीव्र स्पर्धा आणि सोशल मीडियावरील यशाचे दबावाचे चित्र यामुळे काही विद्यार्थ्यांना अपयश अस वाटू शकते. अनेकदा विद्यार्थी आत्महत्यांच्या कारणांमध्ये कौटुंबिक समस्या, प्रेमसंबंध, आजारपण आणि परीक्षेतील अपयशासह करिअरविषयक समस्या, एकटेपणा, मानसिक विकार, व्यसन आणि आर्थिक नुकसान यांसारखी कारणे समोर आली आहेत.

## थोडक्यात
### कच्च्या तेलाच्या किंमतीत पुन्हा मोठी वाढ
**नवी दिल्ली** - कच्च्या तेलाच्या संदर्भात एक मोठी आणि महत्वाची बातमी समोर आली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतीत पुन्हा एकदा मोठी वाढ झाल्याचे समोर आले आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्ध पुन्हा सुरु झाल्याचा थेट परिणाम कच्च्या तेलाच्या किमतींवर झाला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल १०५ डॉलरवर पोहोचल्या आहेत. दरम्यान, या कच्च्या तेलाच्या वाढत्या दराचा परीणाम भारतावर काय होणार का? पेट्रोल डिझेलचे दर वाढणार का? असा सवालही उपस्थित केला जात आहे. होर्मुझची सामुद्रधुनी जगभरातील कच्च्या तेलाच्या आयातीचा स्त्रोत आहे. भारत हा कच्च्या तेलाचा सर्वात मोठा आयातदार देश असून, त्याच्या कच्च्या तेलाचा एक मोठा हिस्सा याच मार्गाने येतो. त्यामुळे, कच्च्या तेलाच्या किमतीतील कोणत्याही चढ-उताराचा भारतावर थेट परिणाम होतो. फेब्रुवारीच्या अखेरीस युद्ध सुरू झाल्यापासून कच्च्या तेलाच्या किमती सातत्याने वाढत आहेत, मे महिन्यात तर पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत सलग चार वेळा वाढ झाली, जी एक मोठी वाढ होती.
जेव्हा कच्च्या तेलाच्या किमती सातत्याने वाढत होत्या आणि कमी होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नव्हती, तेव्हा मे महिन्यात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत चार वेळा वाढ करण्यात आली. जरी भारत कच्च्या तेलाचा सर्वात मोठा आयातदार देश असला तरी, तो पूर्णपणे एकाच देशावर अवलंबून नाही. अनेक देशांमधून भारतात कच्चे तेल येते, त्यामुळे कोणत्याही एका देशाच्या मार्गावरील अवलंबित्व टाळले जाते.

# सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना दुपारी कार्यालयात हजर राहणे बंधनकारक

**वृत्तसंस्था, मुंबई**
महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून आता जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार यांना गुरूवार दि. १० सप्टेंबरपासून स्वतः च्या कार्यालयात दुपारी ३ वा ते ५ वा पर्यंत नागरिकांच्या प्रशासकीय अडी अडचणीसाठी थांबावेच लागणार असून या संदर्भातील शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाने जारी केला आहे.
प्रशासनाला अधिक लोकाभिमुख करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व कार्यालयप्रमुखांना सोमवार ते शुक्रवार दररोज दुपारी ३ ते ५ या वेळेत आपल्या कार्यालयात हजर राहून नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. नागरिकांच्या तक्रारींचे स्थानिक व क्षेत्रीय पातळीवरच जलद, प्रभावी आणि कायदेशीर पद्धतीने निराकरण व्हावे असे कडक निर्देश लेखी पत्राद्वारे दिले आहेत. या भेटीच्या वेळेत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीची त्वरित नोंद घेऊन नियमानुसार तात्काळ कार्यवाही करावी, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.
नागरिकांना ही वेळ सहज समजावी यासाठी प्रत्येक कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर आणि दालनाबाहेर अभ्यागतांची भेट घेण्याची वेळः सोमवार ते शुक्रवार, दुपारी ३ ते ५ असा स्पष्ट फलक लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. नागरिकांना आपल्या छोट्या-मोठ्या कामांसाठी जिल्हा मुख्यालय किंवा मंत्रालयाचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी तालुका व क्षेत्रीय स्तरावरच कार्यक्षम तक्रारनिवारण यंत्रणा राबविण्याच्या सूचना सर्व उपविभागीय, तहसील व शाखा कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.
महसूल मंत्री केव्हाही देणार भेट
महसूल मंत्री स्वतः कोणत्याही कार्यालयाला अचानक भेट देऊन या नियमांच्या अंमलबजावणीची तपासणी करणार आहेत. त्यामुळे या आदेशात हलगर्जी आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरून कठोर कारवाई केली जाईल, असा सज्जड इशाराही जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे.

**कसे आहे नियोजन?**
वेळ : दररोज दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.
उद्देश : शासकीय कामांसाठी येणाऱ्या सामान्य जनतेला किंवा शेतकऱ्यांना अधिकारी जागेवर न मिळाल्यामुळे मनस्ताप सहन करावा लागू नये आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण जलद गतीने व्हावे.
अंमलबजावणी : या राखीव वेळेत अधिकाऱ्यांनी कार्यालयात थांबून नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकणे व त्यावर कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

# मुंबईत मांजरांना निर्घृणपणे संपवले! चेंबूरमध्ये २० हून अधिक मांजरींचे छिन्नविछिन्न मृतदेह आढळले

**वृत्तसंस्था, मुंबई**
मुंबईतील चेंबूरच्या पांजरापोळ परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि क्रूर प्रकार समोर आला आहे. या परिसरात गेल्या काही दिवसांत तब्बल २० हून अधिक मांजरींची अतिशय निर्घृणपणे हत्या करून त्यांचे छिन्नविछिन्न मृतदेह टाकून देण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकारामुळे प्राणिप्रेमींमध्ये संतापाची लाट पसरली आहे. याप्रकरणी आरसीएफ पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरू आहे.
स्थानिक प्राणीमित्र रुबीना पठाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट महिन्यापासूनच त्यांना पांजरापोळ परिसरात छिन्नविछिन्न अवस्थेतील मांजरींचे मृतदेह आढळत होते. त्यानंतर ४ सप्टेंबर रोजी त्यांना आणखी ६ मांजरींचे मृतदेह सापडले, ज्यांचे अंतर्गत अवयव बाहेर आलेले होते. ५ सप्टेंबरच्या सकाळी त्यांना आणखी एक मृत मांजर आणि अत्यंत गंभीर व गंभीररीत्या घाबरलेल्या अवस्थेत एक लहान पिल्लू सापडले.या भयानक घटनेनंतर रुबीना पठाण यांनी 'पेटा इंडिया' या प्राणी संस्थेच्या मदतीने आरसीएफ पोलिसांकडे तक्रार दाखल केली. ९ सप्टेंबर रोजी पोलिसांनी याप्रकरणी औपचारिक एफआयआर नोंदवला आहे. आरसीएफ पोलिसांनी भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ३२५ तसेच प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा, १९६० च्या कलम ११(१)(˙) आणि ११(१)(') अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. बीएनएसचे कलम ३२५ हे प्राण्यांची हत्या करणे, त्यांना विष देणे किंवा अपंग/अक्षम करण्यासंदर्भात असून, यामध्ये ५ वर्षांपर्यंतचा कारावास आणि दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.

# बांगलादेशला पराभूत करून भारतीय महिला क्रिकेट संघ अंतिम फेरीत

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
भारतातील क्रिकेटच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. २०२६ च्या महिला आशिया कपच्या उपांत्य फेरीत भारतीय संघाने बांगलादेशला ४० धावांनी पराभूत करून अंतिम फेरीत धडक दिली आहे. या स्पर्धेत सहभागी होण्याची ही त्यांची १० वी वेळ आहे. आज दुबईमधील आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने २० षटकांत ६ गडी गमावून १४९ धावा केल्या होत्या. शफाली वर्माने संघासाठी सर्वाधिक धावा केल्या, तिने ४० चेंडूंमध्ये ७ चौकार आणि ३ षटकारांसह ६५ धावा केल्या. या डावात बांगलादेशकडून सुलताना खातूनने दोन बळी घेतले होते.



**भारताकडून दीप्ती शर्माने तीन बळी घेतले**
बांगलादेशच्या धावांचा पाठलाग सुरु करताना खराब सुरुवात झाली. त्यांचा शेवट त्याहूनही वाईट होता. हा संघ २० षटकांत ७ गडी गमावून केवळ १०९ धावाच करू शकला. शौर्ना अख्तरने संघासाठी सर्वाधिक धावा केल्या, तिने १ चौकार आणि १ षटकारासह २२ धावा केल्या. दुसऱ्या डावात भारताकडून दीप्ती शर्माने तीन बळी घेतले. लक्ष्याचा पाठलाग करताना, बांगलादेश संघाला २६ धावांवर जुवैरिया फिरदौसच्या रूपाने पहिला बळी गमवावा लागला. त्यानंतर ३५ धावांवर त्यांनी दुसरी विकेट गमावली. काही काळासाठी डाव स्थिरावला. त्यानंतर, ६६ धावांवर त्यांना ७६ धावांवर चौथा, ८३ धावांवर पाचवा, १०९ धावांवर सहावा आणि १०९ धावांवर सातवा बळी गमवावा लागला. यामुळं संघावर दबाव येत गेला, परिणाम बांगलादेशला पराभवाचा सामना करावा लागला.
शोरना अख्तर व्यतिरिक्त, बांगलादेशच्या दिलारा अख्तरने २१ धावा, जुवैरिया फिरदौसने १४ धावा, शोभना मोस्तारीने १८ धावा, कर्णधार निग्रा सुलतानने १९ धावा, शर्मिन अख्तरने १ धाव आणि फातिमा खातूनने १४ धावा केल्या. राबिया खान एकही धाव न काढता पॅव्हेलियनमध्ये परतली.
शफाली वर्मा वगळता, भारतीय संघाचे उर्वरित फलंदाज पूर्णपणे अपयशी ठरले. डावाची सुरुवात करताना स्मृती मंधाना अवघ्या २ धावांवर बाद झाली. प्रतिका रावलने २०, कर्णधार हरमनप्रीत कौरने २४, रिचा घोषने २१ आणि दीप्ती शर्माने १३ धावा केल्या. भारती फुलमाली खाते न उघडताच धावबाद झाली.
बांग्लादेशविरुद्ध टीम इंडियाची कामगिरी चांगली आहे. भारतीय संघाने बांग्लादेशविरुद्ध एकूण २४ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहे. त्यापैकी २१ सामने जिंकले आहेत आणि केवळ तीन गमावले आहेत. भारतीय महिला संघाला बांग्लादेशविरुद्ध २०२३ मध्ये शेवटचा टी-२० आंतरराष्ट्रीय पराभव पत्करावा लागला होता. तेव्हापासून, दोन्ही संघांमध्ये एकूण ८ सामने खेळले गेले आहेत आणि टीम इंडियाने ते सर्व सामने जिंकले आहेत.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत मोटारसायकलस्वार युवकाचा मृत्यू, दोघे जखमी

## कान्द्रीजवळील नागपूर-जबलपूर महामार्गावरील घटना, अज्ञात वाहनचालक फरार

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्गावर कान्द्रीजवळ गुरुवारी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास अज्ञात वाहनाने मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एका युवकाचा मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले. अपघातानंतर अज्ञात वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाला.




प्राप्त माहितीनुसार, मोटारसायकल क्रमांक MH-40 DA 5419 वरून आकाश भरडे (वय २५), अरविंद नायर (वय २०) आणि विशाल भलावी हे तिघेही देवरी-बोरडा या आपल्या गावाकडे जात होते. दरम्यान, कान्द्रीजवळ त्यांच्या मोटारसायकलला मागून आलेल्या अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की, तिघेही रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाले.
अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तातडीने टोल प्लाझाच्या रुग्णवाहिकेला माहिती दिली. माहिती मिळताच डॉ. अनिल गजभिये, रवि आकरे आणि दिवाकर ठाकरे यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तातडीने रामटेक येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, तपासणीअंती डॉक्टरांनी आकाश भरडे यांना मृत घोषित केले. अरविंद नायर आणि विशाल भलावी यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.
घटनेची माहिती मिळताच हायवे पोलिस तसेच रामटेक पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून अपघाताचा तपास सुरू केला आहे. अपघातास कारणीभूत ठरलेल्या अज्ञात वाहनाचा तसेच फरार चालकाचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.
या दुर्दैवी अपघातामुळे देवरी-बोरडा परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मृत आकाश भरडे यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

संपादकीय लेखणीतून...

## श्रीधर फडके

आपल्याकडे अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्व आहेत आणि होऊन गेलीत. ९ सप्टेंबर, संगीतकार श्रीधर फडके यांचा जन्मदिन- वाढदिवस. श्रीधर फडके हे भारतातील श्रेष्ठ गायक आणि संगीतकार म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म मुंबईत १९५० मध्ये झाला. महान कलाकार सुधीर फडके यांचा मुलगा श्रीधर फडके होय. मुंबईत जन्मलेले श्रीधर फडके हे मराठी संगीत उद्योगात चार दशकांहून अधिक काळ एक प्रेरणाशक्ती म्हणून कार्यरत आहेत. मराठी चित्रपट आणि संगीतातील त्यांचे योगदान अतुलनीय आहे आणि त्यांची प्रतिष्ठित गाणी सर्व वयोगटातील प्रेक्षकांच्या जवळची बनली आहेत. श्रीधर फडके (सप्टेंबर ९, १९५० - हयात) महाराष्ट्रातील, भारतातील श्रेष्ठ संगीतकार व गायक आहेत. त्यांचा जन्म मुंबई येथे दि.९ सप्टेंबर १९५० रोजी झाला. ते विख्यात गायक व संगीतकार सुधीर फडके यांचे पुत्र आहेत. संगीतकार, गायक आणि निमार्ता म्हणून फडके यांनी मराठी संगीत जगतात आपली प्रभावी छाप सोडली आहे. मी शिवाजीराजे भोसले बोलतोय आणि राजा शिवछत्रपती ही त्यांची गाणी मराठी अभिमान आणि संस्कृतीचे गीत बनली आहेत. त्याच्या संगीताने अनेक पिढ्या ओलांडल्या गेल्या आहेत. वडिलांच्या शास्त्रीय संगीतावरील प्रभाव असल्यामुळे श्रीधर फडके यांचा संगीतातील प्रवास तरुण वयात सुरू झाला. एकल संगीतकार म्हणून ठसा उमटवण्यापूर्वी त्यांनी कीबोर्ड प्लेअर आणि सहाय्यक संगीतकार म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. सन १९८३ मध्ये चिमणी पाखरं या चित्रपटाने त्यांची प्रगती झाली आणि तेव्हापासून त्यांनी १०० हून अधिक मराठी चित्रपट आणि असंख्य अल्बमना संगीत दिले आहे. त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत, फडके यांना प्रतिष्ठित महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार आणि व्ही. शांताराम पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळून सन्मान मिळाला आहे. त्यांना खरे फळं हे चाहत्यांकडून मिळालेल्या प्रेमात, प्रतिसादात आणि कौतुकामध्ये आहे. जे त्याच्या संगीताची खरंच कदर करतात.

गीत रामायण आणि सुधीर फडके: श्री प्रभू रामचंद्रांचे चरित्र म्हणजे हिंदू संस्कृतीचा गौरवशाली इतिहास. सर्वश्रेष्ठ आदिकवी महर्षी वाल्मिकींनी चोवीस हजार श्लोकांचे रामायण लिहिले. भारतीयांच्या मनावर या रामायणाने हजारो वर्षे राज्य केलं आहे. संस्कृत मध्ये ९४ रामायणे आहेत. मराठी, हिंदी, तामिळ, कानडी, तेलुगु, गुजराती, डोगरी, बंगाली, ओडिसी, असामी, फारसी, प्राकृत, अशा प्रादेशिक भाषेतून सुद्धा रामायण सर्व भाषिकांपर्यंत पोहोचले आहे. कवी मोरोपंतानी तर १०८ रामायणे रचली. संत एकनाथ, श्री समर्थरामदास, अशा संत आणि अनेक साहित्यिकांनी रामायणाच्या माध्यमातून जनतेच्या मनाची जडण घडण केली आहे. जगाच्या इतर भाषांत सुद्धा इंग्लिश, जर्मन, इटालियन भाषेत रामायण आहे. इतके सगळे रामायणाचे अवतार. पण, गदिमांची रससिद्ध प्रज्ञा आणि बाबूजींची सांगीतिक प्रतिभा यांचा अजोड अविष्कार म्हणजे मराठी गीतरामायण. महर्षी वाल्मिकींच्या रामायण या महाकाव्याला सरस्वतीपुत्र ग.दि.माडगुळकर यांनी केवळ छपन्न गीतात समूर्त साकार केलं. लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेला हा एक मराठी विश्वातला चमत्कारच होता. पिढ्यान पिढ्या स्मरणात राहील अशी कलाकृती म्हणजे हे "गीत रामायण" या गीत रामायणाने मराठीला अजरामर केलंय, याचा आम्हा मराठी माणसांना अभिमान आहे.

या गीत रामायणाने रसिक श्रोत्यांवर, अगदी सामान्यातल्या सामान्य माणसालाही वेड लावले. का नाही लावणार? एकतर ही रामायणातील गीते आपल्या बोली भाषेतली, नवरसांनी ओतप्रेत भरलेली, मधुर चालींची, कमालीची भावोत्कट. भारतीय जीवन मूल्यांची महती सांगणारी, मनुष्य जीवनातले आदर्श कसे असावेत याचा धडा देणारी, चांगले व्यक्तिमत्त्व घडण्यासाठी प्रेरणा देणारी गीते. शिवाय बाबूजी म्हणजे सुधीर फडके यांच्या स्वर्गीय संगीत, सुरेल चाली आणि दैवी आवाजामुळे ही रामायणातली गाणी साक्षात रामकथेतील प्रसंग, पात्रे आणि घटनाक्रम यांचे मूर्तिमंत चित्र डोळ्यासमोर उभे करतात. कवीच्या शब्दातील भावना जशाच्या तशा रसिकांपर्यंत पोहोचवण्याच काम त्यांनी केलं आहे. सिद्धहस्त गदिमांच्या कवितेतील शब्दांचा भाव, कवीची भूमिका अत्यंत तन्मयतेने गाण्यातून सादर केली आहे. तरीही गदिमा आणि बाबूजी दोघेही याचे श्रेय घेत नाहीत.ते श्रद्धेने म्हणतात की,"गीतरामायण आम्ही केलेले नाही ते आमच्या हातून झाले आहे. नाहीतर संगीत क्षेत्रात आज असंख्य मोठमोठे कार्यक्रम होत आहेत. पण जोपर्यंत त्याची माध्यमातून प्रसिद्धी होत आहे तोपर्यंतच ते लक्षात राहतात. गीत रामायणाचे हेच वैशिष्ठ आहे, म्हणूनंच ते निर्मिती नंतर ६० वर्षांनी सुद्धा कोटी कोटी लोकांच्या मनात घर करून आहे, गदिमा याबद्दल त्यांच्या कवितेत म्हणतात-

"अजाणतेपणी केव्हा, माता घाली बाळगुटी !<br>
बीज धर्माच्या द्रुमाचे, कणकण गेले पोटी !!<br>
छंद जाणतेपणीचा, तीर्थे काव्याची धुंडिली !<br>
कोणा एका भाग्यवेळी, पूजा रामाची मांडिली !!"

गदिमांनी एका शुभ क्षणी रामाची पूजा मांडली आणि प्रासादिक रचना असलेल्या गीत रामायणाचा जन्म झाला. पण रामकथेचे बीज त्यांच्या मनावर लहानपणीच रुजले होते. तर बाबूजी थोर गायक व संगीतकार याबरोबरच कट्टर हिंदुत्ववादी आणि निष्ठावान देशभक्त होते. निश्चयी स्वभावचे, कडक शिस्तीचे, कष्टाळू, कलेची गुणग्राहकता असलेले, व्यावसाईक निष्ठा असणारे आणि स्वताच्या व्यक्तिमत्वात राम असलेले होते. गीत रामायण म्हटले की गदिमा आणि बाबूजी दोघेही आलेच. गदिमाबद्दल लिहायचे तर बाबूजी अनिवार्य आणि बाबुजीबद्दल लिहायचे तर गदिमा अनिवार्य आहेत.

# ग्लोबल एनर्जी पॉलिटिक्स: अमेरिकेचा दबाव आणि भारताची मुत्सद्देगिरी

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

जागतिक ऊर्जा राजकारणात सप्टेंबर महिन्यात एक अत्यंत महत्त्वपूर्ण घडामोड पाहायला मिळाली. विशेषतः २०२२ च्या रशिया-युक्रेन युद्धानंतर, जागतिक ऊर्जा बाजारपेठेत वेगाने बदल झाले आहेत. या काळात भारताने स्वतःच्या हिताचे रक्षण करत घेतलेली भूमिका जागतिक पातळीवर कौतुकास्पद ठरली आहे.

अमेरिकेने रशियन तेलावर नव्याने निर्बंध आणि टॅरिफ लावण्याचा इशारा दिल्यानंतर, ४ सप्टेंबर २०२६ रोजी भारतातील रशियाचे राजदूत डेनिस अलीपोव्ह यांनी एका मीडियावर दिलेल्या मुलाखतीत अत्यंत सडेतोड भूमिका मांडली. अलीपोव्ह यांनी स्पष्ट केले की, भारत रशियाकडून तेल खरेदी करत आहे, ते रशियाला युद्धात मदत करण्यासाठी नव्हे, तर स्वतःच्या १३०-१४० कोटी जनतेच्या राष्ट्रीय हितासाठी आणि देशाच्या विकासासाठी करत आहे. भारताच्या वाढत्या अर्थव्यवस्थेला लागणाऱ्या ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी रशिया कोणत्याही अटीविना आणि अखंडित तेलपुरवठा करण्यास कटिबद्ध असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच, जागतिक बाजारातून रशियन तेलाला बाहेर काढण्याचे पाश्चिमात्य देशांचे प्रयत्न आंतरराष्ट्रीय ऊर्जा सुरक्षेसाठी अत्यंत विनाशकारी ठरू शकतात, असा कडक इशाराही त्यांनी दिला.

दुसरीकडे, अमेरिकेने रशियाची आर्थिक कोंडी करण्यासाठी आपले दबावतंत्र अधिक आक्रमक केले आहे. याचाच एक भाग म्हणून अमेरिकन सिनेटने नुकतीच 'लिंडसे ओ. ग्रॅहम कायदा २०२६' या कठोर विधेयकाला मंजुरी दिली आहे. या कायद्यानुसार, रशियन कच्चे तेल किंवा गॅस आयात करणाऱ्या जगातील आघाडीच्या ५ देशांवर (ज्यात भारत आणि चीनचा समावेश आहे) तब्बल १०० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त टॅरिफ (शुल्क) लादण्याचे अधिकार अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना मिळणार आहेत. जर हे विधेयक पूर्णपणे लागू झाले, तर अमेरिकेत निर्यात होणाऱ्या भारतीय वस्तूंवर—जसे की औषधे, कापड, आणि इंजिनिअरिंग उत्पादने—१००% कर बसेल, ज्यामुळे या वस्तू अमेरिकन बाजारात महाग होतील आणि भारताच्या निर्यातीला मोठा फटका बसेल. असे असूनही, देशांतर्गत इंधनाचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि वाढत्या महागाईला रोखण्यासाठी रशियन तेल आयात करणे अत्यंत आवश्यक असल्याची भारताची ठाम भूमिका आहे.

पाश्चात्त्य देशांनी रशियन बँकांना जागतिक ' स्विफ्ट ' पेमेंट प्रणालीतून बाहेर काढल्यानंतरही, भारत आणि रशियाने अत्यंत यशस्वी अशी 'रुपया-रुबल' पेमेंट यंत्रणा विकसित करून या निर्बंधावर प्रभावी मात केली आहे. सप्टेंबर २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, दोन्ही देशांमधील तब्बल ९६ टक्के द्विपक्षीय व्यापार आता याच इन्फ्रास्ट्रक्चरद्वारे पार पडत आहे. मॉस्कोमधील 'Sberbank' च्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही यंत्रणा इतकी प्रगत आहे की यातील बहुतांश व्यवहार अवघ्या १० मिनिटांत पूर्ण होतात. जेव्हा भारत रशियाकडून तेल खरेदी करतो, तेव्हा त्याचे पैसे थेट भारतीय रुपयात 'व्होस्ट्रो खात्यांच्या' माध्यमातून जमा केले जाते. रशिया याच रुपयांचा वापर भारतातून औषधे, यंत्रसामग्री आणि तांदूळ आयात करण्यासाठी करत आहे.

बदलत्या जागतिक समीकरणांमध्ये आणि अमेरिकेने प्रस्तावित केलेल्या १०० टक्के टॅरिफच्या (शुल्काच्या) धोक्यामुळे भारताच्या निर्यातीवर, विशेषतः अमेरिकन बाजारावर अवलंबून असलेल्या प्रमुख उद्योगांवर अत्यंत गंभीर परिणाम होऊ शकतो. जर अमेरिकेने खरोखरच हे कठोर निर्बंध लागू केले, तर भारताचा औषधनिर्माण उद्योग जो अमेरिकेला मोठ्या प्रमाणावर स्वस्त आणि जेनेरिक औषधांचा पुरवठा करतो, तो सर्वाधिक प्रभावित होईल; कारण १०० टक्के करामुळे ही औषधे तेथे दुप्पट महाग होतील. यासोबतच, मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देणारा भारताचा वस्त्रोद्योग आणि कापड उद्योग), तसेच इंजिनिअरिंग उत्पादने, यंत्रसामग्री आणि ऑटोमोबाईल सुटे भाग बनवणारे उद्योग मोठ्या संकटात सापडतील आणि त्यांची अमेरिकन बाजारातील स्पर्धात्मकता नष्ट होईल. याशिवाय, अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर निर्यात होणारी रत्ने आणि दागिने तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी हार्डवेअर क्षेत्रालाही या संभाव्य टॅरिफचा मोठा फटका बसेल. थोडक्यात, अमेरिकेचे हे टॅरिफ अस्त्र केवळ राजकीय दबाव न राहता, भारताला परकीय चलन मिळवून देणाऱ्या आणि लाखो लोकांना रोजगार देणाऱ्या या प्रमुख निर्यातक्षम उद्योगांसाठी एक मोठे आर्थिक आव्हान ठरू शकते.

या संपूर्ण व्यापार प्रक्रियेचा सर्वात मोठा आणि दूरगामी परिणाम म्हणजे 'डॉलरवरील अवलंबित्वाचा अंत'. या पयार्यी पेमेंट यंत्रणेमुळे भारत आणि रशियाला त्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठी अमेरिकन डॉलरची अजिबात गरज उरलेली नाही. त्यामुळे अमेरिकेने लादलेल्या आर्थिक निर्बंधांचा या द्विपक्षीय व्यापारावर कोणताही थेट परिणाम होऊ शकलेला नाही. थोडक्यात सांगायचे तर, अमेरिकेचा १०० टक्के टॅरिफचा धोका असतानाही, रशियन राजदूतांची ठाम भूमिका आणि 'रुपया-रुबल' यंत्रणेचे यश हे भारताच्या स्वतंत्र कूटनीतीचे मोठे विजय मानले जात आहेत. राष्ट्रीय हिताशी कोणतीही तडजोड न करता, बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेत स्वतःचे स्थान अधिक बळकट करण्यात भारत यशस्वी ठरत आहे.

आजच्या बदलत्या भू-राजकीय परिस्थितीत भारताने स्वीकारलेले परराष्ट्र धोरण हे अत्यंत प्रभावी ठरत आहे.

भारत कोणत्याही एका महासत्तेच्या गटात (उदा. अमेरिका किंवा चीन-रशिया) सामील न होता, आपल्या राष्ट्रीय हिताला प्राधान्य देत स्वतंत्र निर्णय घेतो. रशिया-युक्रेन युद्धादरम्यान पाश्चात्य देशांचा दबाव असूनही भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची आयात सुरू ठेवली, हे याचे उत्तम उदाहरण आहे. विकसनशील आणि गरीब देशांचा आवाज म्हणून भारत जागतिक मंचावर पुढे आला आहे. भारताने आपल्या जी २०अध्यक्षपदाच्या काळात आफ्रिकन युनियनला जी २०चे स्थायी सदस्यत्व मिळवून देऊन जागतिक राजकारणात ऐतिहासिक पाऊल उचलले. भारत एकाच वेळी परस्परविरोधी हितसंबंध असलेल्या संघटनांमध्ये सक्रिय आहे. एकीकडे भारत अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियासोबत 'क्वाड' मध्ये सामील आहे, तर दुसरीकडे रशिया आणि चीनचा समावेश असलेल्या 'ब्रिक्स' आणि 'शांघाय सहकार्य संघटनेत' देखील महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि डिजिटल क्रांती (उदा. UPI, डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर) मुळे जगातील प्रमुख देश भारताला एक अपरिहार्य भागीदार मानत आहेत. हिंद-प्रशांत क्षेत्रात शांतता आणि सुरक्षा राखण्यात भारताची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. शेजारील देशांशी असलेल्या सीमावादावर (उदा. चीन) कठोर भूमिका घेत भारत राष्ट्रीय सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड करत नाही.थोडक्यात सांगायचे तर, आजचा भारत हा केवळ जागतिक नियमांचे पालन करणारा देश राहिलेला नाही, तर 'रूल मेकर' (नियम बनवणारा) आणि 'विश्वबंधू' या भूमिकेतून स्वतःचे स्थान अधिक मजबूत करत आहे.

-९५६१५९४३०६

# इंग्लंडच्या विश्वविजयाचे स्वप्न साकारणारा कर्णधार इऑन मॉर्गन!

डॉ. दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

क्रिकेटच्या जगात, काही कर्णधार केवळ चषकच जिंकत नाहीत; तर ते संपूर्ण संघाची मानसिकता बदलून टाकतात. त्यांच्या कर्णधारपदाचा प्रभाव धावफलकाच्या पलीकडेही दिसून येतो. इऑन मॉर्गन असाच एक कर्णधार आहे. आयर्लंडच्या हौशी क्रिकेटच्या मैदानांमधून पुढे आलेल्या मॉर्गनने, ऐतिहासिक लॉर्ड्सच्या मैदानावर इंग्लंडला विश्वविजेतेपद मिळवून दिले. मात्र, या मैलाच्या दगडापर्यंतचा मार्ग सोपा नव्हता. इंग्लंडला गेल्यानंतर, मॉर्गनला त्याच्याच देशात टीकेला आणि 'देशद्रोही' अशा विशेषणांना सामोरे जावे लागले. १० सप्टेंबर १९८६ रोजी आयर्लंडमधील डब्लिन येथे जन्मलेल्या इऑन मॉर्गनची क्रिकेटमधील प्रतिभा अशा वातावरणात विकसित झाली, जिथे क्रिकेट हा मर्यादित लोकप्रियतेचा खेळ होता. त्या वेळी, आयर्लंडची स्थानिक क्रिकेट व्यवस्था पूर्णपणे हौशी होती. अगदी पोस्टमन, गवंडी आणि मेकॅनिकसुद्धा राष्ट्रीय संघाकडून खेळत असत. तथापि, मॉर्गनची एक अनोखी क्रीडा पार्श्वभूमी देखील होती.

हर्लिंग हा एक पारंपरिक आणि वेगवान आयरिश खेळ आहे, ज्यामध्ये लाकडी काठ्या वापरल्या जातात. हर्लिंगमुळे मॉर्गनची चपळता आणि मनगटाची ताकद वाढली, जी पुढे त्याच्या फलंदाजीचे वैशिष्ट्य बनली. आपल्या रिव्हर्स स्वीप आणि लहान सीमारेषेवरील पिक-अप शॉट्समुळे मॉर्गन आपल्या काळाच्या खूप पुढे होता. त्याची प्रतिभा इतकी स्पष्ट होती की, तो लहान वयातच आयर्लंडच्या ज्युनियर संघांमध्ये स्थान मिळवू लागला.

### वयाच्या १६ व्या वर्षी वरिष्ठ संघात पदार्पण

इऑन मॉर्गनने वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी आयर्लंडच्या वरिष्ठ राष्ट्रीय संघात पदार्पण केले आणि तो या संघासाठी खेळणारा आतापर्यंतचा सर्वात तरुण खेळाडू ठरला. तथापि, किशोरवयीन असतानाही मॉर्गनची स्वप्ने केवळ आयर्लंडपुरती मर्यादित नव्हती. मॉर्गन आपल्या शाळेतील शिक्षकांना आणि सहकाऱ्यांना उघडपणे सांगायचा की, आयर्लंडच्या पलीकडे जाऊन इंग्लंडसाठी खेळणे आणि कसोटी क्रिकेटमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणे हे त्याचे सर्वात मोठे स्वप्न आहे. २००५ मध्ये, त्याने आपले सामान आवरले आणि व्यावसायिक क्रिकेट खेळण्यासाठी मिडलसेक्स काउंटी क्रिकेट क्लबमध्ये प्रवेश घेतला. लंडन हे त्याचे नवीन घर बनले. २००९ मध्ये, मॉर्गनने अधिकृतपणे आपली आंतरराष्ट्रीय निष्ठा आयर्लंडकडून इंग्लंडकडे वळवली. 'देशद्रोही' म्हटले जाऊनही मॉर्गन अविचलित राहिला.

इंग्लंडला जाण्याचा निर्णय मॉर्गनसाठी सोपा नव्हता. आयर्लंडमधील अनेक क्रिकेट चाहत्यांनी त्याला 'देशद्रोही' आणि 'आयर्लंडचा देशद्रोही' असेही म्हटले. लोकांना वाटले की त्यांच्या सर्वात प्रतिभावान खेळाडूंपैकी एकाने त्यांना सोडून दिले आहे, परंतु टीकेला न जुमानता मॉर्गन आपल्या भूमिकेवर ठाम राहिला. जगातील सर्वोत्तम खेळाडूंसमोर सर्वात मोठ्या मंचावर स्वतःला सिद्ध करणे हे त्याचे ध्येय होते. अखेरीस, त्याने इंग्लंड संघात स्थान मिळवले आणि किशोरवयापासून पाहिलेले स्वप्न पूर्ण केले. तथापि, कर्णधार म्हणून मॉर्गनची सर्वात मोठी परीक्षा अजून बाकी होती.

२०१५ मध्ये संघ विस्कळीत झाला आणि कर्णधार म्हणून त्याचे सर्वात मोठे आव्हान समोर आले. २०१५ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या काही दिवस आधी, अँलिस्टर कुकला कर्णधारपदावरून हटवण्यात आले आणि इऑन मॉर्गनकडे संघाची सूत्रे सोपवण्यात आली. त्यावेळी इंग्लंड व्हाईट-बॉल क्रिकेटमध्ये कालबाह्य आणि बचावात्मक शैलीने खेळत होता. विश्वचषकातील संघाची कामगिरी निराशाजनक होती. बांगलादेशकडून पराभव झाल्यानंतर इंग्लंड गट फेरीतच स्पर्धेतून बाहेर पडला. माध्यमांकडून तीव्र टीका झाली आणि चाहतेही निराश झाले. इंग्लंडच्या व्हाईट-बॉल क्रिकेटची अवस्था अत्यंत खालावली होती. या पराभवानंतर मॉर्गनने आपली संपूर्ण मानसिकता बदलली.

या पराभवातून माघार घेण्याऐवजी, इऑन मॉर्गनने त्याचा उपयोग बदलाचा आधार म्हणून केला. प्रशिक्षक ट्रेव्हर बेलीस यांच्यासोबत मिळून त्याने संघाची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न केला. मॉर्गनने आपल्या खेळाडूंना एक स्पष्ट संदेश दिला: त्यांनी निर्भयपणे क्रिकेट खेळले पाहिजे. त्याचा संदेश होता, "षटकार मारण्याच्या प्रयत्नात तुम्ही बाद झालात, तरी मी तुम्हाला संघातून वगळणार नाही. तुमची विकेट वाचवण्यासाठी तुम्ही बचावात्मक क्रिकेट खेळलात, तर तुम्हाला माझ्या संघात खेळायला मिळणार नाही." मॉर्गनच्या या दृष्टिकोनामुळे जोस बटलर, जेसन रॉय आणि बेन स्टोक्ससारख्या खेळाडूंना आक्रमक क्रिकेट खेळण्याची संधी मिळाली. इंग्लंडने मोठी धावसंख्या उभारण्यास सुरुवात केली आणि अनेक प्रसंगी संघाने ४०० धावांचा टप्पाही ओलांडला.

### लॉर्ड्सवर मॉर्गनचे सर्वात मोठे स्वप्न साकार झाले

मॉर्गनच्या कर्णधारपदाखाली इंग्लंडच्या व्हाईट-बॉल क्रिकेटमधील परिवर्तनाचा कळस २०१९ च्या एकदिवसीय विश्वचषकात गाठला गेला. अंतिम सामन्यात इंग्लंडचा सामना न्यूझीलंडशी झाला आणि लॉर्ड्सवरील या सामन्याने उत्साहाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. सामना बरोबरीत संपला. सुपर ओव्हरही अनिर्णित राहिली आणि इंग्लंडने नाट्यमय पद्धतीने विश्वचषक जिंकला. पुरुषांच्या एकदिवसीय विश्वचषकातील हे इंग्लंडचे पहिले विजेतेपद होते. डब्लिनच्या हौशी खेळपट्ट्यांवरून पुढे आलेल्या इऑन मॉर्गनने आता लॉर्ड्सवर इंग्लंडला विश्वविजेता बनवले होते. संघाच्या खराब सुरुवातीनंतर एकेकाळी टीकेला सामोरे गेलेल्या या कर्णधाराने आता इंग्लंडच्या क्रिकेट इतिहासातील सर्वात अविस्मरणीय अध्याय लिहिला होता.

### कर्णधारपदाचा राजीनामा, पण एक वारसा मागे ठेवला

२०२२ पर्यंत, सतत आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्याचे आणि त्याच्या खालावलेल्या वैयक्तिक फॉर्मचे परिणाम दिसू लागले. फिटनेसच्या समस्याही वाढल्या. अखेरीस, जून २०२२ मध्ये, इऑन मॉर्गनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आणि कर्णधारपद जॉस बटलरकडे सोपवले.

मॉर्गनच्या निवृत्तीनंतर अनेक कर्णधार, प्रशिक्षक आले, बऱ्याच आयसीसी ट्रॉफी झाल्या. बटलरच्या नेतृत्वात सन २०२२ चा टि २० वर्ल्ड कपही जिंकला मात्र परंतु मॉर्गनच्या नेतृत्वाची बरोबरी कोणीही करू शकला नाही. कारण मॉर्गनचे तत्व, जिद्द व ध्येय वेगळेच होते. त्यामुळे इतरांपेक्षा वेगळा होता हे आपोआप सिद्ध होते.

- १०९६३७२०८२

# जीवन जगण्यासाठी आहे !



कल्पना शैलेश तांबट

आजकाल धावपळीच्या युगात प्रेत्यक जण कुठल्या ना कुठल्या गोष्टी साठी सतत धावपळ करत आहे. कुणी प्रसिद्धी साठी, कुणी पैसा साठी, कुणी उच्च पदा साठी, कुणी, मान सन्माना साठी, कुणी नावा साठी, प्रत्येक जण त्याच्या इच्छा साठी धावपळ करत आहे. या धावपळीत मनुष्य हे विसरून गेला की जीवन हे जगण्या साठी सुद्धा आहे. व्यपारी, मजूरदार, नोकरी, करणारे कुणीही असो सवार्ना च धावपळ आहे. कामे एवढे असतात. की स्वःताहा साठी वेळ काढत नाही. एका वया पर्यंत च तूम्ही चांगले जीवन जगू शकता नंतर शरीर थकले की कुठेही जाता येत नाही. जोपर्यंत हे समजत तो पर्यंत वेळ निघून गेलेली असते. म्हणून थोडा वेळ काढून जीवन हे जगुन बघा.

जगणे म्हणजे काय तर तुमच्या रोजच्या दिनक्रमातुन थोडा वेळ स्वतः साठी काढणे.

छान कुठे तरी फिरायला जाणे. आपल्या परिवार सोबत मित्र मंडली सोबत छान एखादा चांगले ठिकाण बघून किंवा एखादे तीर्थ स्थळ जाऊन येणे. कुठे जायचेच म्हटले तर पैसे आणी वेळ लागणारच आहे. पैसा आणी वेळ हे आपल्या साठी जीवन जगण्या साठी आहे. कधी कधी आपल्या बाल मित्र, नातेवाईक याच्याशी गप्पा मारणे. कधी थोडा वेळ काढून भजन कीर्तन ऐकने. त्याने समाधान मिळते.

समाजातील कार्यक्रमात सहभागी होणे. जीवन हे भक्ती साठी, कीर्तीसाठी, स्वतःचे ध्येय प्राप्ती साठी आहे,त्याच बरोबर जीवन जगण्या साठी आहे. काही जण सतत कामात असतात कुणाशी संवाद नाही. कुठे जाणे नाही. सतत आयुष्य असेच घालतात. याला जीवन जगणे नाही म्हटल्या जात. आपल्या जीवनातील एक एक दिवस पुढे ढकलने असे वाटते.

म्हूणन जीवन हे जगण्या साठी आहे. भर भरून जगा.

जगताना विशेष प्रकृती कडे लक्ष द्या तुमचे आरोग्य चांगले असेल तर जीवन चंगले जगता येईल. जीवनात रोज एका नवीन प्रश्नांना थोंड दयावे लागते. ते हिमतीने आणी डोकं शांत ठेऊन त्यावर मार्ग काढा. कोणत्या ही गोष्टीचा जास्त विचार करू नका. प्रयत्न करा. हसत खेळत, सर्वांना मिळून मिसळून सर्वांशी प्रेमाने जीवन जगा. जीवन खूप सुंदर आहे. एकमेकांना समजून घ्या. प्रत्येकाला मन आहे हे विसरू नका. हसा, हसवत राहा, सुखी आनंदी जीवन जगा जीवन जगण्यासाठी आहे.

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# विमानप्रवासातून 'इस्रो'पर्यंत; थूगाव निपाणी शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा!

## उत्कृष्ट शाळा व्यवस्थापन समितीचा जिल्हास्तरीय बहुमान, शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते गौरव

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

लोकसहभाग, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने राबविण्यात येणाऱ्या नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या जोरावर जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा थूगाव निपाणीने शैक्षणिक क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. शाळेच्या विकासासाठी खंबीरपणे उभ्या राहिलेल्या शाळा व्यवस्थापन समितीची जिल्ह्यातील उत्कृष्ट शाळा व्यवस्थापन समिती म्हणून निवड झाली असून, शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते समितीचा गौरव करण्यात आला. या सन्मानामुळे थूगाव निपाणी गावासह नरखेड तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्राची मान उंचावली आहे.



शाळा व्यवस्थापन समितीने केवळ बैठका घेण्यापुरती भूमिका न ठेवता शाळेच्या विकासाची जबाबदारी प्रत्यक्ष कृतीतून पार पाडली. शाळेतील शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, सामाजिक आणि विद्यार्थी विकासाच्या विविध उपक्रमांना समितीने सातत्याने पाठबळ दिले. लोकसहभागातून शाळेच्या गरजा पूर्ण करण्याबरोबरच विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व आधुनिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी समितीने पुढाकार घेतला.

सन २०२३-२४ मध्ये 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' उपक्रमात थूगाव निपाणी शाळेने विभागीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. शाळेच्या भौतिक सुविधांसह शैक्षणिक गुणवत्ता, स्वच्छता, विद्यार्थी सहभाग, लोकसहभाग आणि विविध उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीची दखल या माध्यमातून घेण्यात आली.

शाळा व्यवस्थापन समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे थूगाव निपाणी येथील शाळेचे उच्च प्राथमिक स्तरावरून माध्यमिक शाळेत रूपांतर झाले. त्यामुळे गावातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणासाठी इतरत्र जाण्याची गरज कमी झाली असून, गावातच पुढील शिक्षणाची दारे खुली झाली आहेत. माध्यमिक शिक्षणाची सुरुवात झाल्यानंतर शिक्षकसंख्या अपुरी असतानाही शिक्षकांनी घेतलेल्या अथक परिश्रमांना समितीच्या सहकार्याची जोड मिळाली. त्यातून शाळेचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला. मर्यादित साधनसामग्री आणि विविध अडचणींवर मात करून मिळविलेले हे यश शाळेच्या गुणवत्तेचे द्योतक ठरले आहे.

थूगाव निपाणी शाळेच्या कार्याची सर्वाधिक चर्चा ठरलेला उपक्रम म्हणजे विद्यार्थ्यांची करण्यात आलेली बंगळुरू शैक्षणिक सहल. लोकसहभागातून तब्बल पाच लाख रुपये जमा करून विद्यार्थ्यांना विमानप्रवासाचा अनुभव देण्यात आला. विद्यार्थ्यांनी बंगळुरू येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्था तसेच विविध शैक्षणिक संस्थांना भेटी देऊन विज्ञान, तंत्रज्ञान आणि अवकाश संशोधनाची प्रत्यक्ष माहिती घेतली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विमानप्रवासाचा अनुभव देत इस्रोसारख्या प्रतिष्ठित संस्थेची सफर घडवून आणणे हा उपक्रम त्यांच्या शैक्षणिक जीवनातील अविस्मरणीय अनुभव ठरला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाची आवड निर्माण होण्याबरोबरच मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा मिळाली.

विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि जीवनकौशल्ये विकसित व्हावीत, यासाठी दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या बालसंस्कार शिबिरालाही समितीकडून भक्कम सहकार्य दिले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा राबवत असलेल्या विविध उपक्रमांना समितीने नेहमीच प्रोत्साहन दिले आहे.

या सर्व उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत थूगाव निपाणी शाळा व्यवस्थापन समितीची जिल्हास्तरीय उत्कृष्ट समिती म्हणून निवड करण्यात आली. हा पुरस्कार समितीच्या एकजुटीचा, लोकसहभागाचा आणि शाळेच्या विकासासाठी गावाने घेतलेल्या सामूहिक पुढाकाराचा गौरव मानला जात आहे.

समितीचे अध्यक्ष गिरीधर चौधरी, उपाध्यक्ष धनश्री दिग्रसे यांच्यासह सदस्य विनोद चौधरी, विजय चौधरी, संजय बडोदेकर, श्यामसुंदर वैष्णव, संदीप देशमुख, उषा देवासे, कविता ढबाले, किरण कवडेती, अरविंद क्षीरसागर आणि दीपक देशमुख यांनी शाळेच्या विकासात मोलाची भूमिका बजावली. शिक्षक प्रतिनिधी संदीप बागडे यांनी शाळा व समिती यांच्यातील समन्वय साधत विविध उपक्रमांना गती दिली, तर समितीचे सचिव धनंजय पकडे यांनी समन्वयाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली. यावेळी इस्त्रोला भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ज्ञानदा गुंड, योगिता गोरे, चैताली चौधरी, अंशू ढोले आणि सारंग देशमुख यांनी शैक्षणिक सहलीतील आपले अनुभव कथन केले.

गटविकास अधिकारी अक्षय भगत यांनी थूगाव निपाणी शाळा व्यवस्थापन समितीचे अभिनंदन करताना सांगितले की, थूगाव निपाणी शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीने यापूर्वीदेखील प्रत्येक पायरीवर स्वतःची क्षमता सिद्ध केली आहे. शाळेच्या विकासासाठी समितीने घेतलेल्या पुढाकारामुळे आज जिल्हास्तरावर तिचा गौरव झाला आहे. थूगाव निपाणीच्या या सन्मानाने नरखेड तालुक्याचीदेखील मान उंचावली असून, त्यांच्या यशाचा आलेख असाच वाढत राहो, हीच सदिच्छा. शाळा ही केवळ शिक्षकांची किंवा विद्यार्थ्यांची नसून संपूर्ण गावाची असते, हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवत थूगाव निपाणी शाळा व्यवस्थापन समितीने जिल्ह्यासमोर आदर्श निर्माण केला आहे. मिळालेला हा सन्मान एका समितीपुरता मर्यादित नसून, शाळेच्या प्रगतीसाठी एकत्र आलेल्या संपूर्ण गावाच्या शैक्षणिक एकजुटीचा आणि विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना मिळालेल्या पंखांचा गौरव ठरला आहे.

## कोच्छी डॅममध्ये बुडालेल्या शेतकऱ्याचा मृतदेह दुसऱ्या दिवशी सापडला



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा-सावनेर**

पोलीस स्टेशन खापा हद्दीत येणाऱ्या कोच्छी डॅम परिसरात काल, ९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता, बैलाला धुण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा पाय घसरून नदीच्या पाण्यात बुडाल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच खापा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत काळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तसेच स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने शोधमोहीम राबवली; मात्र काल मृतदेह आढळून आला नाही. दरम्यान, आज १० सप्टेंबर रोजी दुपारी १२ दरम्यान बावनगाव नदीच्या काठावर दगडाला अडकलेला मृतदेह आढळून आला. याची माहिती पोलीस निरीक्षक चंद्रकांत काळे यांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली.

त्यानंतर गावकऱ्यांच्या मदतीने मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांच्या मदतीने मृतदेह सावनेर येथील शासकीय रुग्णालया दाखल करण्यात आला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, घटनेचा पुढील तपास खापा पोलीस करीत आहेत.

## वाढदिवसाचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलवला!

### गौतम पंचभाई यांचा स्तुत्य उपक्रम, अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा व कन्या हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना नोटबुक-पेनचे वाटप

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळावी, त्यांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी आणि आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, या सामाजिक भावनेतून जालालखेडा येथील वॉर्ड क्रमांक १ मधील अंगणवाडी तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व कन्या हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना गौतम पंचभाई यांच्या वाढदिवसानिमित्त नोटबुक व पेनचे वाटप करण्यात आले.



वाढदिवस साजरा करताना अनावश्यक खर्च करण्याऐवजी त्यातून समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. या उपक्रमामुळे अंगणवाडीतील चिमुकल्यांपासून ते शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींपर्यंत सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला. वाढदिवसाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून शिक्षणासाठी मदतीचा हात हा सकारात्मक संदेश देण्यात आला.

विद्यार्थ्यांना वह्या, पेन यांसारख्या आवश्यक शैक्षणिक साहित्याची मदत मिळाल्याने त्यांच्या अभ्यासाला निश्चितच प्रोत्साहन मिळणार आहे. समाजातील सक्षम व्यक्तींनी आपल्या आनंदाच्या प्रसंगी विद्यार्थ्यांसाठी, शिक्षणासाठी आणि गरजूंसाठी योगदान देण्याची गरज असून, अशा उपक्रमातून सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होते.

यावेळी अंगणवाडीतील लोहे मॅडम, दीक्षा सटवे, जिल्हा परिषद कन्या शाळेचे मुख्याध्यापक विजय भड, यामिनी हेडाऊ मॅडम, कडू, निखिल परतेती, मयूर सावयान, आदित्य खडसे, अंबोरे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षकवृंद उपस्थित होते.

यावेळी गौतम पंचभाई म्हणाले, वाढदिवस हा केवळ स्वतःचा आनंद साजरा करण्याचा दिवस न राहता समाजासाठी काहीतरी देण्याचा दिवस असावा, या विचारातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्याचा निर्णय घेतला. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा येऊ नये आणि विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांसाठी तसेच समाजोपयोगी उपक्रमांसाठी शक्य ते योगदान देण्याचा प्रयत्न राहील.

दरम्यान, या उपक्रमाचे शिक्षक व उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक साहित्य देणे नव्हे, तर त्यांच्या मनात आपणही शिकून मोठे व्हावे, ही प्रेरणा निर्माण करणे महत्त्वाचे आहे. अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यासोबतच शिक्षणाबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



## पोळा सणानिमित्त आपल्या मातीशी नाळ जपत बैलपूजन!

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर :** आपल्या मारडा या मूळ गावी पोळा सणानिमित्त पारंपरिक पद्धतीने बैलांची पूजा करून त्यांचे औक्षण केले. शेतकऱ्यांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करत हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. शेतकरी आणि कृषी संस्कृतीशी असलेले आपले नाते अधिक दृढ करणारा पोळा हा केवळ सण नसून आपल्या ग्रामीण जीवनाचा आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाला, बळीराजाच्या घामाला आणि आपल्या समृद्ध कृषी परंपरेला मनःपूर्वक सलाम! सर्व शेतकरी बांधवांना पोळा सणाच्या हार्दिक शुभेच्छा!

— आमदार सुधाकर अडबाले

# ताजाबाद शरीफ येथे, स्पर्धा परीक्षेबद्दल जागरूकता व त्याची तयारी, यावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन १२ सप्टेंबरला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासोबतच विविध शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये करिअर घडविण्याच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. मात्र, स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, अभ्यासाचे नियोजन तसेच योग्य मार्गदर्शनाचा अभाव यामुळे अनेक विद्यार्थी या संधींपासून वंचित राहतात. ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच त्यांच्या योग्य तयारीसाठी स्पर्धा परीक्षांबाबत जागरूकता व त्याची तयारी या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा शनिवार, दि.१२ सप्टेंबर रोजी हजरत बाबा ताजुद्दीन कला व वाणिज्य महाविद्यालय, ताजाबाद शरीफ, उमरेड रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आली आहे. हजरत बाबा ताजुद्दीन कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर, यशोदा कन्या कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर, अंजुमन कला महाविद्यालय, नागपूर तसेच उम्मे सलमा कला व विज्ञान महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रमोदजी लाखे, संचालक, महाराष्ट्र राज्य भारतीय प्रशासनिक सेवा प्रशिक्षण केंद्र, मॉरिस कॉलेज, जुना परिसर, नागपूर हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी अब्दुल सलीम अब्दुल जब्बार, अध्यक्ष, शादाब एज्युकेशन सोसायटी, नागपूर राहणार असून, मो. शादाब अब्दुल सलीम, सचिव, शादाब एज्युकेशन सोसायटी, नागपूर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी केवळ अभ्यास करणे पुरेसे नसून योग्य अभ्यासक्रमाची निवड, वेळेचे नियोजन, नियमित अभ्यास, प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव आणि परीक्षेची अचूक रणनीती याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता असते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, अभ्यासाचे नियोजन, प्रभावी अध्ययन पद्धती, प्रश्नपत्रिका सोडविण्याचे कौशल्य आणि परीक्षेत यश मिळविण्यासाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन मिळणार आहे. विशेषतः शासकीय सेवेत करिअर करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार असून, विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या विविध संधींची माहिती मिळण्याबरोबरच तयारीसाठी योग्य दिशा मिळणार आहे.

या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यशाळेचे प्रमुख संयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शकील सत्तार यांनी केले आहे. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी संयुक्त महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी अथक परिश्रम घेत आहेत.

### थोडक्यात

## "औदुंबर" देणार १३ सप्टेंबरला ३० शिक्षकांना गुरुरत्न आदर्श शिक्षक पुरस्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून औदुंबर बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण संस्थेतर्फे नागपूर शहर व जिल्ह्यातील ३० शिक्षकांना गुरुरत्न आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. रविवार १३ सप्टेंबर रोजी, सिव्हिल लाईन येथील, दुपारी १२ वाजता. डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या योगदानाचा गौरव व्हावा आणि त्यांच्या कायार्ला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले आहे. या पुरस्कारासाठी राज्यभरातून तब्बल १५० शिक्षकांचे प्रस्ताव संस्थेकडे प्राप्त झाले होते.

त्यामधून निवड झालेल्या ३० शिक्षकांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. अशी माहिती संस्थेच्या सचिव भाग्यश्री पवार यांनी पत्रपरिषदेच्या माध्यमांतून दिली. यावेळी प्राचार्य सुभाष खाकसे, डॉ. मंदा उमाठे, डॉ. वेदना बडवाईक, डॉ. शारदा रोशनखेडे, कविता पवार, मोना काळे, प्रज्ञा देशपांडे, मनोज कुंभारे, चंद्रप्रकाश चतुर्वेदी आदी उपस्थित होते. शिक्षकांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाचा सन्मान करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या पुरस्कार सोहळ्यास शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांसह शिक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## नागपूर कॉलेज ऑफ फार्मसीला क्युसीआयकडून 'अ' ग्रेड



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री विद्यार्थी सुधार संघ संचालित नागपूर कॉलेज ऑफ फार्मसीला क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाच्या QCI-NABET Institutional Ranking अंतर्गत प्रतिष्ठित 'अ' ग्रेड मानांकन मिळाले आहे. संस्थेने फार्मसी महाविद्यालयांच्या श्रेणीत विदर्भात द्वितीय, महाराष्ट्रात दहावा आणि देशात २८ वा क्रमांक पटकावला आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रमांमुळे हे यश मिळाले असल्याचे संस्थेने सांगितले. आधुनिक प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापक, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि संशोधनात्मक वातावरणाच्या माध्यमातून सक्षम फार्मासिस्ट घडविण्यासाठी संस्था कार्यरत आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या व्यवस्थापन, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व सर्व हितधारकांचे अभिनंदन करण्यात आले. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रिन्सिपल विनोद ठाकरे यांनी कळविले आहे.

## तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धेत मुलींनी मारली बाजी

### नरवीर चिंतामणराव तिडके स्मृती तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धेचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

स्थानिक पाऊलवाट फाउंडेशन पारशिवनी आणि यशवंतराव चव्हाण सेंटर नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने चारगाव जंगल सत्याग्रहाचे प्रणेते, थोर स्वातंत्र्यसेनानी नरवीर चिंतामणराव तिडके स्मृतीप्रीत्यर्थ स्व. राधाबाई पालीवाल स्मृती सभागृह येथे घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धा- कथा क्रांतिकारकांच्या या स्पर्धेत मुलींनी अव्वल स्थान पटकावले. या स्पर्धेचे उद्घाटन केसरीमल पालीवाल विद्यालय येथील पर्यवेक्षक शंभरकर सर यांचे हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत पारशिवनी परिसरातील हरिहर विद्यालय, राणी लक्ष्मीबाई विद्यालय, केसरीमल पालीवाल विद्यालय पारशिवनी, सेक्रेट हार्ट स्कूल करंभाड, तथागत विद्यालय करंभाड, भारतीय आदर्श विद्यालय तामसवाडी, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तामसवाडी, लालबहादूर शास्त्री विद्यालय बाबुळवाडा या शाळांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिकारकांच्या कथा विद्यार्थ्यांनी सादर केल्यात. या स्पर्धेचे परीक्षण सेवानिवृत्त शिक्षक नंदकिशोर बावनकुळे आणि किशोर मूलतेली यांनी केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक सायली कवडू ढगे ( हरिअर विद्यालय पारशिवनी ), द्वितीय क्रमांक माही सुरेंद्र देशभ्रतार (हरिहर विद्यालय पारशिवनी), तृतीय क्रमांक (दिव्या दिनेश वानखेडे) राणी लक्ष्मीबाई विद्यालय पारशिवनी) तर प्रोत्साहन पुरस्कार संस्कृती कमलाकर सार्वे (लालबहादूर शास्त्री विद्यालय बाबुळवाडा) आणि तृप्ती संजय नेवारे (तथागत विद्यालय करंभाड) हे विद्यार्थी या स्पर्धेत अव्वल ठरले. विजेत्या विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण सेंटरचे अध्यक्ष महेश बंग, सर्वोदय आश्रम नागपूरचे सचिव वंदन गडकरी, संस्कार परिवाराचे अध्यक्ष अरुण देशपांडे गुरुजी, सी. मो.झाडे फाउंडेशन च्या सचिव भारती झाडे, विदर्भ साहित्य संघाचे संचालक अनिल इंदाने, यशवंतराव चव्हाण सेंटरचे सदस्य शशिकांत मोहिते,रवी देशमुख, सामाजिक कार्यकर्ते हर्षल शहा यांच्या शुभहस्ते रोख रक्कम, सन्मानचिन्ह, वेधोत्सव स्वातंत्र्याचा पुस्तक आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाऊलवाट फाऊंडेशनचे सचिव तथा स्पधेर्चे संयोजक खुशाल कापसे, प्रास्ताविक पाऊलवाट फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. चेतक इटनकर, तर आभार प्रदर्शन सहसचिव विकास ढोबळे यांनी केले.

## राष्ट्रीय वन शहीद दिनानिमित्त श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

फॉरेस्टर्स अँड फॉरेस्ट गार्डस असोसिएशन ठाणा व अखिल भारतीय वनाधिकारी महासंघ, नवी दिल्ली यांचे संयुक्त विद्यमाने देशाच्या वनसंपदेच्या व वन्यजीवांच्या संरक्षणासाठी कर्तव्य बजावताना आपल्या प्राणांचे सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वन अधिकारी, वनरक्षक, वनपाल, वनमजूर व इतर वन कर्मचाऱ्यांच्या स्मृतीत अभिवादन करण्यासाठी राष्ट्रीय वन शहीद दिनानिमित्त विशेष श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ११ सप्टेंबर रोजी, सकाळी ९ वाजता. ऑफिसर्स क्लब वन भवन जवळ सिव्हिल लाइन्स नागपूर येथे केले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेश नाईक मंत्री वने महाराष्ट्र शासन, कार्यक्रमाचे विषेश अतिथी पाहुणे मा. मिलिंद म्हैसकर वनसचिव, एम. श्रीनिवास राव वनबलप्रमुख व सतीश मिश्रा अध्यक्ष अखिल भारतीय वनाधिकारी महासंघ दिल्ली यांची उपस्थिती राहील. तसेच वेगवेगळ्या राज्यातील वन अधिकारी, संघटना पदाधिकारी व स्थानिक वन अधिकारी / कर्मचारी, सामाजिक संस्था, वनप्रेमी हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

# रंजक किस्से, भावूक आठवणींनी रंगली किशन शर्मा यांची मुलाखत

## विदर्भ साहित्य संघाच्या 'संवादयात्रा'ला उत्तम प्रतिसाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने 'संवादयात्रा' उपक्रमांतर्गत ज्येष्ठ निवेदक किसन शर्मा यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त विशेष सत्कार व मुलाखतीचे आयोजन बुधवारी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार बाळ कुळकर्णी यांनी किशन शर्मा यांची दिलखुलास मुलाखत घेतली. या मुलाखतीदरम्यान त्यांनी उलगडलेले रंजक किस्से आणि जीवनप्रवासातील चढ-उतार ऐकताना उपस्थितांच्या चेहऱ्यावर कधी हसू उमटले, तर कधी भावूक आठवणींनी सर्वांचे मन भरून आले.

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, सरचिटणीस विलास मानेकर, माजी संपादक श्रीपाद अपराजित व ज्येष्ठ पत्रकार बाळ कुळकर्णी यांच्या हस्ते किसन शर्मा शाल, शिफळ देऊन सत्कार करण्यात आला.

किशन शर्मा यांनी बालपणीच्या आठवणी सांगताना खुर्जा सारख्या छोट्या गावातील रिक्षावर मायक्रोफोन लावून चित्रपटांची जाहिरात करणाऱ्या माणसापासून प्रेरणा मिळाल्याचे सांगितले. आकाशवाणीच्या पहिल्या गायन चाचणीत नापास झाल्यानंतर त्याच क्षेत्रात नाव कमावण्याचा मी पक्का हट्ट धरला होता, असे ते म्हणाले. विविध लोकांच्या मुलाखती दरम्यान घडलेले अनेक रंजक किस्से सांगितले.




आपल्या आकाशवाणी आणि रेडिओ प्रवासातील अनेक महत्त्वाचे, नाट्यमय आणि रंजक प्रसंग उलगडले उलगडतान ते म्हणाले, पंडित रविशंकर, सुमित्रानंदन पंत, महादेवी वर्मा आणि दुष्यंत कुमार यांसारख्या महान दिग्गजांच्या सहवासात काम करण्याचे भाग्य लाभले. आकाशवाणीवरील छायागीत या अत्यंत लोकप्रिय कार्यक्रमामुळे त्यांना प्रचंड प्रसिद्धी मिळाली. गीतकार लालजी पांडे (अनजान) यांच्याशी झालेली पहिली भेट आणि मजरूह सुल्तानपुरी यांच्या मुलाखतीदरम्यानचा गमतीशीर किस्साही, डॉ. हरिवंशराय बच्चन आणि अनिल विश्वास यांच्या एका गाण्याचा किस्साही त्यांनी शेअर केला.

नागपूरशी असलेल्या घट्ट नाट्य बद्दल बोलताना त्यांनी नागपूर हे सामाजिक ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मतेचे खरे प्रतीक असल्याचे सांगितले. किसन शर्मा यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा कलाक्षेत्रातील प्रवास आणि त्यांनी जोपासलेले सातत्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन डॉ. गिरीश गांधी यांनी केले. किशन शर्मा यांना श्रीपाद अपराजित यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शुभदा फडणवीस यांनी केले.

थोडक्यात

## अहिल्या किड्स प्री-स्कूलमध्ये तान्हा पोळा



**दै. सिंहवाणी वृत्त, हिंगणा**

सरदार मल्हारराव होळकर बहुउद्देशीय शिक्षण संस्था अंतर्गत अहिल्या किड्स प्रि स्कूल, भोसलेवाडी, हिंगणा येथे विद्यार्थ्यांसाठी पारंपरिक तान्हा पोळा उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष दिलीप उरकुडे, सचिव चंद्रकला उरकुडे, सदस्य सुनीता चतुर व शरद उरकुडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तान्हा पोळ्यानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध आकर्षक वेशभूषा परिधान करून तसेच सुंदर व कल्पक पद्धतीने सजविलेल्या नंदींसह कार्यक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला पारंपरिक आणि आनंदमय वातावरण लाभले. सहभागी विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. उत्कृष्ट नंदी सजावट व आकर्षक वेशभूषा करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन त्यांचा उत्साह वाढविण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आपल्या महाराष्ट्रातील कृषी संस्कृती, बैलांचे महत्त्व आणि पारंपरिक सण-उत्सवांची ओळख करून देण्यात आली. बालवयातच आपल्या संस्कृतीशी नाते जोडण्याचा हा उपक्रम विशेष कौतुकास्पद ठरला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य अश्विनी उरकुडे, शिक्षिका वंदना गोहणे, वैशाली रोकडे, भावना जुनघरे तसेच शिक्षकेतर कर्मचारी मंगला खेडकर यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, पारंपरिक वेशभूषा आणि आकर्षक नंदी सजावटीमुळे तान्हा पोळा उत्सव आनंदात व उत्साहात संपन्न झाला.

## अरोली येथे बैलपोळा उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू-मौदा**

दरवर्षीप्रमाणे यंदाही अरोली आज गुरुवार (ता. १० सप्टेंबर)ला येथे बैलपोळा उत्साहात व शांततेत साजरा करण्यात आला. बैल जोड्या व बैलपोळ्याच्या कार्यक्रम पाहण्यासाठी गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. बैलपोळा भरणाऱ्या परिसरातील इमारतीच्या छतावरही मोठ्या प्रमाणात महिला, पुरुष बालगोपालांची गर्दी दिसत होती. याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख प्रशांत भुरे, ग्रामपंचायत अरोली सरपंच रोशनी प्रशांत भुरे, उपसरपंच सुनील आडगुलकर सह समस्त ग्रामपंचायत सदस्य गण, तंटामुक्त समिती अध्यक्ष कैलास समरीत, अरोली पोलीस स्टेशनचे ठाणेदार सागर गोमासे, गावातील प्रतिष्ठित नागरिक समय ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैलपोळा फुटल्यानंतर शेतकऱ्यांच्या बैलजोड्यांची ग्रामस्थ पूजा अर्चना करून बैलपोळ्याच्या शुभेच्छा देत होते.

## कोदामेंढी येथे बैलपोळा उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही आज गुरुवार (ता. १० सप्टेंबर)ला कोदामेंढी येथे बैलपोळा उत्साहात व शांततेत साजरा करण्यात आला. बैल जोड्या व बैलपोळ्याच्या कार्यक्रम पाहण्यासाठी गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. बैलपोळा भरणाऱ्या परिसरातील इमारतीच्या छतावरही मोठ्या प्रमाणात महिला, पुरुष बालगोपालांची गर्दी दिसत होती. याप्रसंगी भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, तालुका समन्वय समिती सदस्य नरेश बावनकुळे, ग्रामपंचायत कोदामेंढी सरपंच आशिष बावनकुळे, उपसरपंच गोपाल गिरमेकर सह समस्त ग्रामपंचायत सदस्य गण, साईबाबा पतसंस्थेचे संचालक प्रकाश बावनकुळे, मनसेचे राजेश देवतळे,गावातील प्रतिष्ठित नागरिक सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैलपोळा फुटल्यानंतर शेतकऱ्यांच्या बैलजोड्यांची ग्रामस्थ पूजा अर्चना करून बैलपोळ्याच्या शुभेच्छा देत होते.

## हिंदी भाषा दिनानिमित्त १२ सप्टेंबरला कविसंमेलन, विदर्भ साहित्य संघाचा उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हिंदी भाषा दिनानिमित्त विदर्भ साहित्य संघातर्फे हिंदी-मराठी भाषेतील कवींचे विशेष कविसंमेलन शनिवारी, १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता वीर सावरकर मंडप, विष्णुजी की रसोई परिसर, काचीपुरा, नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. माजी विभागीय आयुक्त व हिंदीतील नामवंत कवी अनूपकुमार यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कविसंमेलनाला प्रसिद्ध कवी व लेखक मा. डॉ. तीर्थराज कापगते यांची प्रमुख उपस्थिती राहील. दैनिक भास्करचे कार्यकारी संपादक मणिकांत सोनी तसेच विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. कविसंमेलनात अतुल पाटणे, रिमा चढ्ढा, उमेश यादव, किरण काशिनाथ, अविनाश महालक्ष्मे, डॉ. अश्विनी बरबटे, मनोज मोहिते, माया नरसापूरकर, धनश्री धारकर, गुरदीपसिंग कपूर, डॉ अमृता इंदूरकर आणि जयश्री दाणी या नामवंत कविंचा सहभागी राहणार आहे.

# पोहण्याच्या नादात गेला जीव, पोळ्याच्या दिवशी चिखलीवर शोककळा

## बैलांना आंघोळ घालण्यासाठी नदीवर गेला अन् खोल पाण्यात बुडाला

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

पोळ्याच्या दिवशी बैलांना आंघोळ घालण्यासाठी नदीवर गेलेल्या ४० वर्षीय मजुराचा पोहण्याच्या नादात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी सकाळी भिवापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिखली येथे घडली. मंगेश काळे (४०), रा. चिखली, असे मृताचे नाव आहे.

मंगेश हा गावातील गारघाटे यांच्याकडे मजुरीचे काम करीत होता. पोळ्यानिमित्त सकाळी सुमारे नऊ वाजता तो गारघाटे यांच्या बैलांना आंघोळ घालण्यासाठी गावाबाहेरील नदीवर गेला होता. नदीतील पाणी पाहून त्याला पोहण्याचा मोह झाला. मात्र, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो अचानक खोल पाण्यात बुडाला.

शेजारच्या शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी मंगेशला पाण्याबाहेर काढले. त्याला तातडीने भिवापूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.



बैलपोळ्याच्या दिवशीच घडलेल्या या दुर्दैवी घटनेने चिखली गावावर शोककळा पसरली. भिवापूर पोलिसांनी घटनेची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

# बैलांसोबत ट्रॅक्टरचाही पोळ्यात सहभाग

## बळीराजा बैलपोळा उत्सव समितीतर्फे शेतकऱ्यांचा सन्मान



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारंपरिक संस्कृतीचा वारसा जपत आणि आधुनिकतेची कास धरत 'बळीराजा बैलपोळा उत्सव समिती'च्या वतीने बैलपोळा सण तकीया मारोती देवस्थान परिसरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यंदाच्या पोळा उत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे पारंपरिक बैलजोडीसोबतच शेतीतील आधुनिक सोबती असलेल्या ट्रॅक्टरचाही या मिरवणुकीत विशेष समावेश करण्यात आला होता.

शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी समितीच्या वतीने विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शेतात रात्रंदिवस घाम गाळून संपूर्ण जगाचा पोशिंदा ठरणाऱ्या बळीराजाचा मानाचा दुपट्टा, नारळ, पान आणि टोपी देऊन यथोचित गौरव करण्यात आला. पोळ्याच्या दिवशी सजवलेल्या बैलजोड्या आणि फुलांनी-दिव्यांनी नटवलेले ट्रॅक्टर पाहण्यासाठी गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. पूजनानंतर ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपरिक गाण्यांच्या तालावर मिरवणूक काढण्यात आली. "शेतीमध्ये बैलांचे स्थान अढळ आहेच, पण बदलत्या काळात ट्रॅक्टरही शेतकऱ्यांचा महत्त्वाचा साथीदार बनला आहे. त्यामुळे या दोन्ही घटकांचा सन्मान करून संस्कृती आणि आधुनिकतेचा मेळ घालण्याचा आमचा प्रयत्न होता," असे बळीराजा उत्सव समितीचे बापू तरार पाटील, खुशाल कापसे, राजू भोयर, तुळशीदास प्रधान या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. नगर पंचायत तर्फे आकर्षक प्रवेशद्वार व पाना फुग्यांचे तोरण बांधून सजावट करण्यात आली होती. बैलपोळ्यात नगर दीपक शिवरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य नानाभाऊ सायरे, माजी पंचायत समिती सदस्य श्रीधर झाडे, बांधकाम सभापती रोशन पिंपरामुळे, नगरसेवक, देवानंद वाकोडे, सतीश धुरई, सौरभ वाळके, नरेंद्र जिनींग प्रेसिंगचे संचालक गोविंद कापसे यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे शेतकरी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून समितीच्या या अनोख्या आणि सन्मानजनक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. याप्रसंगी पोलीस निरीक्षक किशोर शेरकी यांचे नेतृत्वात पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खुशाल कापसे यांनी केले.

# काटोल शहरातील गुंठेवारीतल्या लेआऊट मधील प्लॉटधारकांचे नाव सातबारात नोंद करा!

## दिगांबर डोंगरे यांचे उपविभागीय अधिकारी यांना प्लॉटधारकांचे निवेदन सादर, चौकशी करून प्रकरण लवकरच निकाली काढणार : उपविभागीय अधिकारी पीयुष चिवंडे यांचे शिष्टमंडळांना आश्वासन

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

काटोल शहरातील बरेच लेआऊट गुंठेवारीत आहे. पेठबुधवार येथील दमानी लेआऊट हे १९९२ सालातील आहे. यात १०२ प्लॉट धारक आहेत. त्यातील बहुतांश लोकांच्या विक्री झालेल्या आहेत परंतु बऱ्याच लोकांच्या विक्री सब रजिस्ट्रर ऑफिस ने थांबविल्या आहेत गुंठेवारीतल्या लेआऊटचा सातबारा बनत नाही, पण सातबारामध्ये प्लॉट धारकाचे नाव असल्याशिवाय विक्री करता येत नाही.

हा नियम सध्याचे सब रजिस्ट्रर ऑफिस मधुन सांगण्यात येते



त्यामुळे विक्री विक्री थांबविल्या आहेत परंतु हा नियम गुंठेवारीला लागु होत नाही. तरीपण सब रजिस्ट्रर विक्री करत नाही विक्री होत नसल्यामुळे फेरफार होऊन प्लॉट धारकाचे नावाची नोंद होत नाही. त्यामुळे तेथील लोकांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळत नाही तसेच मुलांच्या शिक्षणाकरिता लग्नाकरिता आरोग्याच्या इलाजकरिता बँकेकडून कर्ज घेता येत नाही तसेच मुलांच्या शिक्षणाकरिता शासकीय सर्टिफिकेट बनविता येत नाही हा प्लॉट धारक लोकांना त्रास देणारा विषय आहे.

तेव्हा हा त्रास दुर होऊन त्यांचा विक्रीचा व फेरफारचा विषय प्रशासनानी तात्काळ सोडवावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाच्या मार्फत बहुजन वंचित क्रांति सेनेचे जिल्हा अध्यक्ष तथा काटोल न. प चे माजी सभापती दिगांबर डोंगरे व नगरसेविका प्रज्ञाताई डोंगरे यांनी दिला आहे.

माझी सभापती दिगांबर डोंगरे व नगरसेविका प्रज्ञाताई डोंगरे यांच्या नेतृत्वात याविषयीचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले. निवेदन देतेवेळी बालू भगत, निखिल आंबुलकर, कलावती खोडे, प्रमिला गाढवे, संगीता आंबुलकर, सारिका पंडितपवार, पार्वती बावणे, पुष्पा बाभूळकर, रेहाना शेख, रंजना बावणे, अफसाना शेख, सरुबाई बावणे, अरुण दुधकवडे, ईश्वर गाढवे आदी प्लॉटधारक उपस्थित होते.

# डीजेवरील निर्बंधाच्या तणावातून शेतकरी डीजे व्यावसायिकाची विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

## गणेशोत्सवाच्या तोंडावर व्यवसायावर मर्यादा आल्याने चिंता, देवग्राम येथील सतीश वानखेडे नागपूरला उपचारासाठी रवाना

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर डीजे वाजविण्यावर शासनाकडून घालण्यात आलेल्या निर्बंधामुळे व्यवसायावर परिणाम होण्याची चिंता आणि दुसरीकडे पावसाने ओढ दिल्याने शेतीपिकांची झालेली अवस्था, या दुहेरी संकटाच्या पार्श्वभूमीवर नरखेड तालुक्यातील देवग्राम येथील शेतकरी तथा डीजे व्यावसायिकाने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना बुधवारी रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास घडली. सतीश नत्थुजी वानखेडे (वय ४५, रा. देवग्राम) असे विष प्राशन करणाऱ्या डीजे व्यावसायिकाचे नाव आहे. त्यांच्यावर सध्या नागपूर येथे उपचार सुरू आहेत.

सतीश वानखेडे यांच्याकडे शेती असून त्यासोबत ते डीजेचा व्यवसाय करतात. गणेशोत्सवाच्या काळात डीजेला मोठी मागणी असते. मात्र, यंदा डीजे वाजविण्यावर विविध निर्बंध आल्याने व्यवसायावर परिणाम होण्याची चिंता त्यांना सतावत होती. त्यातच यावर्षी पावसाने सुरुवातीपासूनच अनियमितता दाखवल्याने शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडला आहे. शेतीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करूनही पावसाअभावी पिके सुकण्याच्या मार्गावर असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मागील काही दिवसांपासून वानखेडे हे व्यवसाय आणि शेतीच्या परिस्थितीमुळे तणावात होते. बुधवारी रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास ते बोपापूर शिवारातील आपल्या शेतात गेले. तेथे त्यांनी विषारी पदार्थ



प्राशन केला. त्यानंतर त्यांनी आपल्या मित्राला दूरध्वनी करून विष प्राशन केल्याची माहिती दिली. माहिती मिळताच मित्रांनी तत्काळ शेताकडे धाव घेतली आणि त्यांना उपचारासाठी जलालखेडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र, विषारी पदार्थाचे प्रमाण अधिक असल्याने त्यांची प्रकृती गंभीर झाल्याचे समजते. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी जलालखेडा प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन घटनेची माहिती घेतली असून पुढील तपास सुरू केला आहे.

**शेतीसोबत जोडधंद्यावरही संकट**

पावसाची अनिश्चितता, वाढता शेती खर्च आणि पिकांची खराब होत चाललेली अवस्था यामुळे शेतकरी आधीच आर्थिक विवंचनेत आहे. त्यातच गणेशोत्सवाच्या काळात उत्पन्नाचा आधार ठरणाऱ्या डीजे व्यवसायावर निर्बंध आल्याने या व्यवसायावर अवलंबून असलेल्या व्यावसायिकांमध्येही अस्वस्थता निर्माण झाली आहे. देवग्राम येथील घटनेने शेतकरी आणि ग्रामीण भागातील लघु व्यावसायिकांसमोरील आर्थिक संकट पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# 'एआय' मोड्यूलने महावितरणचा वीजचोरांवर सर्जिकल स्ट्राईक

## ३ महिन्यांत २८ हजार वीजचोऱ्यांचा पर्दाफाश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वीजचोरीविरोधी तडाखा देण्याच्या मोहिमेमध्ये महावितरणने आता एआयच्या 'सुपर इंटेलिजन्स'चा वापर करून वीजचोरांवर सर्जिकल स्ट्राईक सुरु केला आहे. तब्बल १९० भरारी पथकांकडून वीजजोडण्यांची तपासणी आणि एआय मोड्यूलच्या सूक्ष्म विश्लेषणातून गेल्या तीन महिन्यात ६६ कोटी २८ लाख रुपयांच्या २७ हजार ९६४ वीजचोऱ्यांचा पदार्फाश झाला आहे. आतापर्यंत वीजचोरी व तडजोड शुल्काची रक्कम न भरलेल्या २८९ प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

वीजचोरीविरोधी पारंपरिक तपासणीसोबतच महावितरणने आता हायटेक मोहीम उघडली आहे. यासाठी थेट 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' व 'मशीन लर्निंग'चा वापर करून वीजचोरीचे अचूक भाकित करणारे मोड्यूल तयार केले आहे. वीजग्राहकांचा किंवा परिसरातील वीज वापराचा जुना आलेख, अचानक घटलेली किंवा वाढलेली मागणी, मीटरमधील तांत्रिक फेरफार आणि इतर ५० हून अधिक तांत्रिक निकषांचे हे मोड्यूल २४ तास सूक्ष्म विश्लेषण करत आहे. ज्या ग्राहकांच्या वीजवापरामध्ये शंकास्पद फरक आढळत आहे त्या ग्राहकांना हे एआयचे मोड्यूल 'हाय-रिस्क' श्रेणीत टाकत आहे. त्यामुळे कोणत्याही तपासणीशिवाय थेट चोरी होणाऱ्या ठिकाणाची अचूक माहिती या मोड्यूलद्वारे उपलब्ध होत आहे. एआयच्या 'सुपर इंटेलिजन्स'चा वापर करून वीजचोरीच्या ठिकाणांची तपासणी करण्यासाठी महावितरणचे राज्यभरात १९० हून अधिक विशेष भरारी पथके कार्यरत आहेत. वीजचोरीविरोधी धडक कारवाईत कुठेही हयगय होऊ नये यासाठी वीजजोडण्यांच्या तपासणीपासून ते वीजबिलांच्या आकारणीपर्यंत संपूर्ण प्रक्रिया 'थेफ्ट ट्रॅकिंग ॲण्ड मॉनिटरिंग सिस्टीम'द्वारे पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे. यासाठी एक स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. वीजचोरीचे ठिकाण ते तपासणीचे लाईव्ह फोटो, डिजिटल पंचनामा, जागेवरच वीजपुरवठा खंडित करणे आणि दंडात्मक बिलांची वसूली करेपर्यंतची सर्व माहिती या ॲपमध्ये रिअल-टाईम अपडेट केली जात आहे.

गेल्या जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांत महावितरण अंतर्गत संवसु विभाग आणि सुरक्षा व अंमलबजावणी विभागाच्या नियमित व विशेष पथकांनी छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागात ५ हजार ८३, कोकण- ११ हजार ८३, नागपूर- ५ हजार ९४९ आणि पुणे प्रादेशिक विभागात ५ हजार ८४९ अशा एकूण २७ हजार ९६४ वीजचोऱ्या उघड केल्या आहेत. त्यातील २४ हजार ५०८ वीजचोऱ्यांच्या मूल्यांकनातून ६६ कोटी २८ लाख रुपयांची वीजचोरी केल्याचे स्पष्ट झाले आहे व संबंधितांना त्याचे वीजबिल देण्यात आले आहे. आतापर्यंत वीजचोरीच्या बिलांपोटी १० हजार ८१० प्रकरणांत २९ कोटी ८५ लाख रुपयांचा भरणा करण्यात आला आहे.

वीजचोरीच्या संपूर्ण रकमेचा तडजोड शुल्कासह मुदतीत भरणा केला नाही तर संबंधित वीजचोरांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत २८९ प्रकरणांत कलम १३५ नुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात



आले आहे. वीजचोरीच्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या व दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.

लोकेश चंद्र (मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण) म्हणाले, येत्या तीन वर्षांत महावितरणची तांत्रिक व वाणिज्यिक हानी १० टक्क्यांपेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी वीजबिलांच्या थकबाकी वसूलीला प्राधान्य देत विजचोरीविरुद्ध धडक मोहीम सुरु करण्यात आली आहे. वीजचोरीचे प्रकार उघड करण्यासाठी 'एआय' मॉड्यूल विकसित करण्यात आले असून त्याद्वारे वीजचोरीविरुद्धची धडक कारवाई आणखी तीव्र व अचूक करण्यात आली आहे.

थोडक्यात

## एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालयात तान्हा पोळा उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सत्यमेव जयते शिक्षण प्रसारक मंडळ नागपूर द्वारा संचालित एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालय, एकात्मता नगर, जयताळा, नागपूर येथे तान्हा पोळा उत्साहात व पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आकर्षक व विविध पारंपरिक वेशभूषा परिधान करून उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी आपले नंदी आकर्षक पद्धतीने सजवून शाळेच्या प्रांगणात आणले. रंगीबेरंगी सजावट, पारंपरिक वेशभूषा आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले. वेशभूषा व नंदी सजावट स्पर्धेत उत्कृष्ट ठरलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून उद्योजक, मिथुन नागदेवते, मुख्याध्यापक, शरद उरकुडे, तसेच शाळेचे माजी विद्यार्थी अमोल कदम उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे व उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षिका शुभांगी ठवकर, सुनिता गावंडे, धनश्री ढेगेकर व सोनल फुंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून तान्हा पोळा सणाचे तसेच भारतीय संस्कृती व ग्रामीण परंपरांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे तान्हा पोळा कार्यक्रम आनंददायी, शैक्षणिक आणि संस्मरणीय ठरला.

## (महादुला) कोराडीमध्ये बैलपोळा अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

महादुला धनगौरी मंदिर येथील पटांगणात बैलपोळ्याचे तोरण बाबा भालेराव गावातील जुने पोलिस पाटील यांनी बांधले. भक्तिभावाने सगळ्या शेतकऱ्यांच्या नंदी (बैलांची)भक्तिभावाने पूजा केली या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते मनोज सावजी (ठाकूर) मुख्य अतिथी होते. तसेच भाजपा गटनेते अभिजित ढेंगरे, हर्षल हिंगणेकर, रोहनकर, नगरसेवक अजय सोलंकी, भाजप कार्यकर्ते जितेश भगत जेष्ठ नेते सुभाष ढेंगरे, राजू राऊत वसंता राऊत, हिंगणेकर गुरुजी यांची उपस्थिती होती तसेच कोराडी, क्रीडासंकुल समोर देखील बैलपोळा संदीप घुरिले युवा मित्र मंडळ कडून भरविण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते संदीप घुरिले, निरंजन घुरिले, कोराडी सरपंच नरेंद्र धनुले, रुद्रप्रताप सिंह ठाकुर, नीलेश वताखैरे, कैलास बासबरीले, राधेश्याम बासबरीले, शुभम गहरुले, राहुल गहारुले, ऋषभ खंगारले, राकेश कटोले, धनराज बिरखेडे, राकेश जामदार, गोलू नवघरे, राकेश जामदार, सागर निमोणे, आदित्य बैस, रामसिंह जामदार, निखिल अतकरे, रोशन जाम दार,रोहन आवरकर, यांनी शेतकार्याच्या बैलांची पूजा अर्चना केली. परिसरात ढोल-ताशे वाजवून जोरदार वराडी झडत्या गायन केल्या. खूप छान आनंदमय वातावरणात बैलपोळा उत्सव कोराडी महादुल्यात साजरा झाला.

## ई-पिक पाहणीतील तांत्रिक अडचणी दूर करा!

### सालेकसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अडचणींकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेसचे निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

सालेकसा तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये शेतकऱ्यांना ई-पिक पाहणीची नोंदणी करताना विविध तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत असून, या समस्या तातडीने दूर करून ई-पिक पाहणीची प्रक्रिया सुरळीत करावी, या मागणीसाठी बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी सालेकसा तहसील कार्यालय येथे माननीय तहसीलदार साहेबांना निवेदन देण्यात आले. ई-पिक पाहणी करताना मोबाईल अँपमध्ये तांत्रिक अडचणी, नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी तसेच अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांना वेळेत पीक नोंद करता येत नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहेत. त्यामुळे प्रशासनाने या समस्यांची गांभीयार्ने दखल घेऊन तातडीने तांत्रिक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी राजू दोनोडे, तालुका अध्यक्ष काँग्रेस कमिटी सालेकसा, सुनील हत्तीमारे, तालुका अध्यक्ष किसान काँग्रेस कमिटी सालेकसा, बंटीभाऊ कटरे, संचालक दि. को-ऑपरेटिव्ह बँक सालेकसा, जोशनाताई आत्राम, अध्यक्ष महिला काँग्रेस कमिटी सालेकसा, ममताताई पटले, राणेताई, जागेश्वर नागपुरे, सेवा दल अध्यक्ष, राजेश कनोजे, सेवा दल सचिव, मोतीलाल हरिणखेडे, सुदाम शेंडे, आत्माराम मेंढे, निलेश हरिणखेडे, पुरुषोत्तम फुने, कटरेजी, पटलेजी, महेंद्र भरतभाऊ बहेकार, चुनीलाल शेंडे यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी तसेच तालुक्यातील शेतकरी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी लक्षात घेता ई-पिक पाहणीची प्रक्रिया सुलभ, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि शेतकऱ्यांना सहज करता येईल अशी व्यवस्था प्रशासनाने उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## महापारेषणाच्या हिंगणा उपकेंद्रातील विद्युत उपकरणात बिघाड, महावितरणच्या तत्परतेने तासाभरात वीजपुरवठा सुरळीत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महापारेषणच्या हिंगणा येथील १३२ केव्ही हिंगणा-१ उपकेंद्रातील बस सेक्शन-१ ला जोडलेल्या विद्युत दाब मोजणाऱ्या उपकरणात (पीटी - पोटेन्शियल ट्रान्सफॉर्मर) गुरुवारी पहाटे २.३३ वाजताच्या सुमारास अचानक बिघाड झाला. त्यात या उपकरणाचा स्फोट होऊन आग लागल्याने हिंगणा-१ उपकेंद्रातून होणारा वीजपुरवठा बाधित झाला. त्याचवेळी हिंगणा-२ च्या यंत्रणेवर वीजपुरवठ्याचा भार वाढल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने संरक्षण यंत्रणा कार्यान्वित झाली आणि हिंगणा-२ चा वीजपुरवठाही आपोआप खंडित झाला. त्यामुळे




पश्चिम नागपूरातील काही भागांचा वीजपुरवठा तात्पुरता प्रभावित झाला.

घटनेची माहिती मिळताच संबंधित अभियंते व तांत्रिक पथकांनी तातडीने कार्यवाही सुरू केली. बाधित भागांचा वीजपुरवठा दीर्घकाळ बंद राहू नये यासाठी उपलब्ध अन्य वीजवाहिन्यांमधून पर्यायी वीजपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली. या घटनेमुळे प्रत्रिमूर्तीनगर, जयताळा, आयटी पार्क, शंकरनगर आणि खामला परिसरातील वीजपुरवठा तात्पुरता प्रभावित झाला. महावितरणच्या तत्पर कार्यवाहीमुळे शंकरनगर परिसरातील सुमारे २० हजार आणि खामला परिसरातील सुमारे ८ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा ३० मिनिटांत पूर्ववत करण्यात आला.

तसेच त्रिमूर्तीनगरमधील सुमारे १५ हजार आणि जयताळा परिसरातील सुमारे १० हजार ग्राहकांचा वीजपुरवठा ५० मिनिटांत, तर आयटी पार्क परिसरातील सुमारे ८ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा एका तासात सुरळीत करण्यात आला. या आकस्मिक तांत्रिक बिघाडामुळे संबंधित भागांतील सुमारे ६१ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा तात्पुरता प्रभावित झाला होता. मात्र, अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांनी पर्यायी वीजपुरवठ्याची तातडीने व्यवस्था केल्यामुळे काही भागांत ३० मिनिटांत तर सर्व बाधित भागांत कमाल एका तासाच्या आत वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला.

पहाटेच्या वेळी उद्भवलेल्या या आकस्मिक परिस्थितीत महावितरणच्या पथकांनी तत्परतेने कार्यवाही करून वीजपुरवठा सुरळीत केला. त्यामुळे दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित राहणे टाळता आले आणि ग्राहकांची गैरसोय कमीत कमी ठेवण्यात यश आले.

## रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीत सार्वजनिक बैलपोळा उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

शेतकरी आणि बैल यांच्यातील अतूट, जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित करणारा बैलपोळा उत्सव रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीत पारंपरिक उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. सार्वजनिक पोळ्याच्या निमित्ताने परिसरातील शेतकरी आणि बैलजोडी मालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. रंगीबेरंगी सजावट केलेल्या बैलजोड्या आणि पारंपरिक वेशभूषेतील ग्रामस्थांमुळे बाजार समिती परिसराला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते. या निमित्ताने कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचिन किरपान,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हनुमंता महाजन,वीरेश आष्टनकर, देवा मुरमुरे, टेकाडे सर आणि नागपूरे सर यांच्या वतीने सहभागी झालेल्या सर्व बैलजोडी मालकांचा दुपट्टा देऊन सन्मान करण्यात आला. या सन्मानामुळे शेतकरी बांधवांमध्ये आनंदाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले.

बैलपोळा हा केवळ एक सण नसून शेतकरी आणि पशुधनाच्या परस्परावलंबी नात्याचा उत्सव आहे. वर्षभर शेतीच्या कामात शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून मेहनत करणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा केला जातो. आधुनिक युगात शेतीचे स्वरूप बदलत असले तरी बैलपोळ्याच्या माध्यमातून जपली जाणारी ही ग्रामीण परंपरा आजही तितकीच महत्त्वाची आहे. यावेळी बोलताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचिन किरपान यांनी शेतकरी, बैल आणि ग्रामीण संस्कृती यांच्यातील नाते जपणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे सांगितले. शेतकऱ्याच्या जीवनात बैलांचे योगदान अत्यंत मोलाचे असून, आपल्या समृद्ध ग्रामीण परंपरा आणि पशुधनाविषयीची कृतज्ञता पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. सार्वजनिक पोळ्यानिमित्त बैलांना पारंपरिक पद्धतीने सजवून त्यांची पूजा करण्यात आली. विविध रंगांच्या सजावटीने नटलेल्या बैलजोड्यांचे बाजार समिती परिसरात आगमन होताच उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले. बैलजोड्यांच्या मिरवणुकीमुळे परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हनुमंता महाजन, वीरेश आष्टनकर, देवा मुरमुरे, टेकाडे सर, नागपूरे सर यांच्यासह गावातील मान्यवर, शेतकरी, बैलजोडी मालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, रामटेक शहरातील विविध भागांतही बैलपोळा उत्सव पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शेतकऱ्यांनी आपल्या बैलांची विधिवत पूजा करून त्यांना आकर्षक पद्धतीने सजविले. त्यानंतर बैलजोड्यांचे सार्वजनिक पोळ्यात आगमन झाले. यावेळी बैलजोडी मालकांचा सन्मान करण्यात आला. ग्रामीण संस्कृती, शेतकरी जीवन आणि पशुधनाप्रती कृतज्ञतेची भावना जपणारा रामटेकचा सार्वजनिक बैलपोळा उत्सव सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक बांधिलकीचे दर्शन घडविणारा ठरला. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यंदाचा पोळा उत्सव अविस्मरणीय ठरला.

## कवी दिनेश बसेने यांच्या 'गहिवरल्या क्षणांचे कोलाज'चे प्रकाशन

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

दिनेश काशीराम बसेने मित्रपरिवार,रामटेक यांच्या संयोजनातून दिनांक ८ सप्टेंबर रोजी रामटेक येथील महाकवी कालिदास स्मारक परिसरात प्रसिद्ध कवी व समीक्षक प्रा. डॉ. गिरीश सपाटे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रसिद्ध कवी, कथाकार, अनुवादक प्रा.डॉ.सावन धर्मपुरीवार यांच्या हस्ते कवी दिनेश काशिराम बसेने या विदर्भातील महत्वपूर्ण युवा कवीचा 'गहिवरल्या क्षणांचा कोलाज' हा काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात आला.




यावेळी प्रा.डॉ.रवींद्र पानतावणे, गीतकार डॉ. पवन कामडी 'प्रीत', प्रा.मिनाज पौचातोड, राकेश खलासने यांच्यासह कवितासंग्रहाचे कवी दिनेश बसेने यांचीही या साध्या व छोटेखानी सोहळ्याला उपास्थिती होती. गेल्या अडीच दशकापासून सातत्याने कविता लिहणारे व कवितेशी इमान राखणारे कवी दिनेश बसेने यांच्या या कवितासंग्रहाला सुप्रसिद्ध कवी, कादंबरीकार तसेच युवा साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर यांची प्रस्तावना लाभलेली आहे.तसेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवयित्री कल्पना दुधाळ यांनी या कवितासंग्रहाची पाठराखण केली आहे.संतोष घोंगडे यांचे चित्र मुखपृष्ठ म्हणून या कवितासंग्रहास अधिकच सुंदर बनविते.

कार्यक्रमादरम्यान प्रत्येक उपस्थितांनी तसेच स्वतः कवीने कवितासंग्रहातील एक-एक आशयपूर्ण कवितांचे वाचन केले. प्रा.मिनाज पौचतोड यांनी कवी दिनेश यांच्या कवितेचे विविध पैलू उलगडले. दिनेशची कविता शेती-मातीशी, ग्रामीण जीवनातील विविध अनुभवाशी निगडित असून एक पुरुष असूनही स्त्रीच्या मनातील संवेदना रेखाटणारी ताकदीची कविता असल्याचे मत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतातून ,कवी व समीक्षक प्रा.डॉ.गिरीश सपाटे म्हणाले की, दिनेशची कविता ही अल्पाक्षरी असून त्यातून बहुमूल्य असा धीरगंभीर आशय व्यक्त करणारी आहे. वैशिष्ट्यपूर्ण भाषेतून,विविधांगी प्रतिमा-प्रतिकातून वाचकांना भुरळ घालणारी ही संयतशील कविता आहे.वाचक व समीक्षक नक्कीच या कवितासंग्रहाची दखल घेईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. अतिशय कठीण परिस्थितीत कवी मेघराज मेश्राम व डॉ.गिरीश सपाटे यांच्या प्रमुख मार्गदर्शनातून व अनेकांच्या सहकायार्तून हा संग्रह निर्मितीस आल्याचे यावेळी आपल्या मनोगतातून कवी दिनेश म्हणाले.

रामटेक तालुक्यातील चिचाळा या लहानशा गावातील कवी दिनेश यांच्या कविता 'कवितारती' सारख्या नियतकालिकातून तसेच महाराष्ट्रातील अनेक दर्जेदार दिवाळी अंकातून सातत्याने वाचकांच्या भेटीला वषार्नुवषार्पासून येत आहे..या प्रकाशन सोहळ्याचे संचालन राकेश खलासने यांनी केले तर आभार डॉ.पवन कामडी 'प्रीत' यांनी मानले.

# जिल्हा गुणवंत विद्यार्थी समारोहात कोटजमुरा शाळेच्या राज भंडारी व परी नागपुरे यांचा गौरव

## शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत शाळेचा नावलौकिक, गुणवत्तेची जिल्हास्तरावर दखल

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

सन २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा, कोटजमुरा येथील राज भंडारी आणि परी नागपुरे यांचा जिल्हा परिषदेतर्फे आयोजित जिल्हा गुणवंत विद्यार्थी समारोहात गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर होते. कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी जेनीतचंद्रा दोनतुला, उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती सुरेश हर्षे, अर्थ व बांधकाम सभापती डॉ लक्ष्मण भगत, समाज कल्याण सभापती रजनी कुंभरे, महिला व बाल कल्याण सभापती पौर्णिमा ढेंगे, कृषी व पशु संवर्धन सभापती दीपा चंद्रिकापुरे, जिल्हा परिषद सदस्य विमलताई कटरे उपस्थित होते.शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत दोन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेसह




पालक, शिक्षक आणि गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाची दखल घेत जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने त्यांचा सत्कार करून प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद असून, मेहनत, सातत्य आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यांचा सुंदर संगम या यशातून दिसून येतो. राज भंडारी व परी नागपुरे यांच्या यशामुळे कोटजमुरा शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक राधेश्याम टेकाम पदवीधर शिक्षक सेवकराम रहांगडाले, सहायक शिक्षक डिरेंद्रकुमार बनोठे, स्वयसेविका विद्या दमाहे, वर्षा दमाहे, पालक, शाळा व्यवस्थापन समिती तसेच ग्रामस्थांनी दोन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या यशाने इतर विद्यार्थ्यांनाही ह्यमेहनत केली तर यश नक्की मिळते, असा प्रेरणादायी संदेश मिळाला आहे.

थोडक्यात

## दुष्काळग्रस्त भागांचे तातडीने सर्वेक्षण करून नियमानुसार नुकसान भरपाई देणार

**महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभाग संयुक्तपणे करणार सर्वेक्षण, नियमावलीनुसार जात प्रमाणपत्र वाटपासाठी शिबिरे, अमरावती प्रकरणात दोषींवर कठोर कारवाईचे संकेत : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील ज्या भागात पावसाने दडी मारल्यामुळे पिकांचे नुकसान झाले आहे, त्या भागांचे तातडीने सर्वेक्षण करण्याच्या सूचना



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासन आणि मुख्य सचिवांना दिल्या आहेत. महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभाग संयुक्तपणे हे सर्वेक्षण करणार असून, सर्वेक्षणानंतर नियमानुसार शेतकऱ्यांना आवश्यक ती नुकसानभरपाई देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, अशी माहिती महसूलमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. महसूलमंत्री आणि नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासन आणि मुख्य सचिवांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. ज्या ठिकाणी पावसाने दडी मारल्यामुळे पिके करपली आहेत, अशा भागांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून संयुक्तपणे हे सर्वेक्षण होईल. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर नियमांनुसार निश्चित मदत देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**अमरावती प्रकरणात दोषींवर कारवाई सुरूच राहणार**

अमरावती येथील रुग्णालयातील घटनेच्या चौकशीसाठी शासनाने दहा सदस्यीय समिती नियुक्त केली होती. या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून, प्राथमिक चौकशीनंतर संबंधितांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मात्र, एवढ्यावरच हे प्रकरण थांबणार नसल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. या घटनेच्या मुळाशी जाऊन सखोल चौकशी करण्यात येत आहे. भविष्यात अशा प्रकारे निष्पाप जीव जाऊ नयेत, यासाठी समितीने केलेल्या शिफारशींची महाराष्ट्रातील सर्व रुग्णालयांमध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. विशेषतः नवजात बालकांसाठीची केंद्रे आणि तेथील यंत्रणा अधिक आधुनिक व सक्षम करण्यासाठी शासन योजना आखत आहे, असे त्यांनी सांगितले.

**हायकोर्टाच्या निरीक्षणानुसार पोलीस उत्तर देतील**

हायकोर्टाने केलेल्या विचारणेबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, न्यायलयाने विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर पोलीस देतील. पोलिसांनी सर्व बाबींची चौकशी करून अहवाल तयार केला आहे. हायकोर्टाने केलेल्या निरीक्षणानुसार पोलीस आपली बाजू मांडतील. या प्रकरणाची चौकशी निष्पक्षपणे झाली असून, दोघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याबाबतही सरकारने विचार केला आहे. सरकारी जमिनीबाबतही शासन गंभीर असल्याचे सांगत ते म्हणाले, यापुढे सरकारी जमीन कोणाच्याही घशात जाणार नाही, यासाठीही शासनाने ठोस उपाययोजनांचा विचार केला आहे.

**नियमावलीनुसार जात प्रमाणपत्र वाटपासाठी शिबिरे**

मराठवाड्यात जात प्रमाणपत्र वाटपासाठी घेण्यात येणाऱ्या शिबिरांबाबत बावनकुळे म्हणाले, यापूर्वीही अशा प्रकारची शिबिरे घेण्यात आली आहेत. शासनाने यापूर्वीही पुढाकार घेऊन जात प्रमाणपत्रांचे वाटप केले आहे. उपलब्ध नियमावलीनुसार शिबिरे घेऊन प्रमाणपत्रांचे वितरण करणे हे शासनाचे धोरणच आहे. ओबीसी महासंघाच्या मागणीबाबत ते म्हणाले, त्यांची मागणी अद्याप माझ्याकडे आलेली नाही. आमच्याकडे मागणी आल्यानंतर ती आमच्या ओबीसी समितीसमोर ठेवण्यात येईल.

**शक्तिपीठ महामार्गाच्या अंदाजपत्रकावरून रोहित पवारांवर टीका**

शक्तिपीठ महामार्गाच्या कामाच्या खर्चावरून आमदार रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांना उत्तर देताना बावनकुळे म्हणाले, राष्ट्रीय महामागार्चा रस्ता तयार करताना केवळ वरचा थर टाकून काम होत नाही. नवीन रस्ता तयार करण्यासाठी माती, मुरूम आणि इतर सर्व आवश्यक कामे खालपासून करावी लागतात. प्रत्येक रस्त्याचे स्टँडर्ड आणि कामाचे स्वरूप वेगळे असते. त्यामुळे त्यांचे रेट आणि अंदाजपत्रकही वेगळे असते.

हे रोहित पवार यांना माहीत आहे; मात्र समाजामध्ये नकारात्मक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शक्तिपीठ महामार्ग तयार होईल तेव्हा तो खालपासून वरपर्यंत पूर्णपणे नव्याने तयार केला जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डोळ्यात तेल घालून शासनाचा आणि जनतेचा पैसा वाया जाणार नाही, याची काळजी घेत अंदाजपत्रक व सादरीकरण तयार केले आहे. या प्रकल्पात येणाऱ्या काळात कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार होणार नाही आणि भ्रष्टाचाराला थारा दिला जाणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# 'काम नाही, वेतन नाही' शासन निर्णय रद्द करा!

**आमदार सुधाकर अडबाले यांची आदिवासी विकास मंत्र्यांकडे बैठकीत मागणी, आश्रमशाळा शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या निवारणार्थ मुंबईत सभा**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षक - कर्मचारी यांच्यावर अन्याय करणारा 'काम नाही वेतन नाही' हा दि. ८ जून २०१६ चा शासन निर्णय रद्द करण्यात यावा, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्याकडे आयोजित बैठकीत लावून धरली. यावर शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर आदिवासी विकास विभागातील अतिरिक्त कर्मचाऱ्यांचेही समायोजन होईपर्यंत वेतन सुरू ठेवण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात यावा व सदर बाब कर्मचारी हिताला बाधा आणणारी असल्यामुळे सदर शासन निर्णय परत घेण्यासाठी अधिकाऱ्यांना प्रस्ताव तयार करण्यास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी निर्देश दिले.



आदिवासी आश्रमशाळा शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या ज्वलंत समस्यांबाबत आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोकजी उईके यांच्यासोबत लोहगड बंगला, मुंबई येथे मंगळवारी (ता. ८) सायंकाळी बैठक पार पडली. बैठकीत दीर्घ सुट्टी विभागात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरण लागू करावे, अनुदानित आश्रम शाळेतील विशेष खास बाब म्हणून मान्यता देण्यात आलेल्या १४३३ कर्मचाऱ्यांचे थकबाकी वेतन अदा करण्यात यावी, शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक व कर्मचारी यांचे वेतन एक तारखेला करण्यात यावे, १९८२-८४ ची जुनी पेन्शन योजना जशीची तशी लागू करण्यात यावी, कनिष्ठ महाविद्यालयीन संलग्न असलेल्या मुख्याध्यापकांना सहाव्या वेतन आयोगानुसार ४९०० ग्रेड पे तर सातव्या वेतन आयोगानुसार S-18 ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, शाळा व वसतिगृह विभाग वेगळा करण्यात यावा, नवीन आकृतीबंध रद्द करून विलोपित झालेली पदे पुनर्जीवित करण्यात यावीत. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वर्ग चार कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देण्यात यावी, विना चौकशी कर्मचाऱ्यांवर छोट्या मोठ्या कारणासाठी निलंबनाची कार्यवाही करण्यात येऊ नये, माध्यमिक मुख्याध्यापकांना राजपत्रित अधिकाऱ्याचा दर्जा देण्यात यावा.

तसेच साप्ताहिक सुट्टी लागू असल्या बाबत स्पष्ट निर्देश देणारे परीपत्रक काढण्यात यावे, शिक्षकांना १०-२०-३० ही तीन लाभांची आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात यावी, शिक्षण कक्षातील पदोन्नती कोट्यातील पदे तातडीने भरण्यात यावी व शिक्षण कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात यावा, ग्रंथपालांना सुधारित वेतनश्रेणी व पदोन्नतीची संधी उपलब्ध करून देण्यात यावी, चारही विभागातील बदल्या या दिनांक ९ एप्रिल २०१८ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार समुपदेशनानेच व पारदर्शक पद्धतीने केल्या जाव्यात, शासन निदेर्शानंतर अद्यापही प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे, शासकीय व अनुदानित आश्रम शाळेतील माध्यमिक शिक्षकांना तसेच पदवीधर प्राथमिक शिक्षकांना एकस्तर अंतर्गत ४८०० ग्रेडवेतन व प्राथमिक शिक्षकांना ४३०० ग्रेडवेतन लागू करण्यात यावे. तसेच वेतन निश्चिती करतांना जोडपत्र तीन नुसार १३३५०+४८०० याप्रमाणे माध्यमिक शिक्षकांची व १०१००+४३०० याप्रमाणे प्राथमिक शिक्षकांची वेतन निश्चिती करण्यात यावी, अपर आयुक्त स्तरावरील प्रलंबित सर्व पदोन्नत्या तातडीने करण्यात याव्यात, सर्व आश्रम शाळांमधील लिपिक संवर्गाची पद भरती तातडीने करणेबाबत तसेच पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत रिक्त असलेल्या पदावर मानधन तत्वावर लिपिक संवर्गीय पद भरती करणेबाबत, अनुदानित आश्रम शाळेत कनिष्ठ महाविद्यालय संलग्न असेल तर प्रयोगशाळा परिचर यांना प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर पदोन्नती देण्यात यावी, प्रयोगशाळा सहाय्यक यांना सुधारित वेतनश्रेणी व पदोन्नतीची संधी उपलब्ध करून देण्यात यावी, अनुदानित आश्रम शाळेतील प्रयोगशाळा परिचर यांना एकस्तर पदोन्नती अंतर्गत सहाव्या वेतन आयोगानुसार २४०० व सातव्या वेतन आयोगानुसार S-8 वेतन स्तर लागू करणे बाबत, बाकी विभागाप्रमाणे प्रयोगशाळा परिचर यांना वर्ग ३ चा दर्जा देण्यात यावा व इतर विषयांवर चर्चा करण्यात आली. या सर्व विषयांवर मंत्री डॉ. अशोक उईके यांनी सकारात्मक उत्तर देत प्रश्न निकाली काढण्याबाबत अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

बैठकी करिता मंत्रालय स्तरावरून उपसचिव जाधव, अवर सचिव गवस, कक्ष अधिकारी साखरे व घाडगे, अपर आयुक्त नाशिक पावरा, अपर आयुक्त नाशिक (मुख्यालय) डिगांबर चव्हाण हे प्रत्यक्ष उपस्थित होते तसेच इतर तीन अपर आयुक्त व आयुक्त महोदय हे ऑनलाईनच्या माध्यमातून उपस्थित होते.

यावेळी आदिवासयी विकास आश्रमशाळा शिक्षक व कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष डॉ. डी एल कराड, राज्य सरचिटणीस प्रा. बी टी भामरे, अमरावती विभागीय अध्यक्ष डॉ. अशोक झुंजारे, कोषाध्यक्ष प्रा. मांजरमकर, ठाणे विभागीय अध्यक्ष डॉ. प्रमोद पोगेरे, निलेश खापरे, नागपूर विभागीय अध्यक्ष आर.टी. खवशी, नाशिक विभागीय अध्यक्ष प्रा. अमोल वाबळे, नागपूर विभागीय उपाध्यक्ष श्री. यादव धानोरकर, विभागीय सहसचिव विकास जनबंधु, चंद्रपूर अनुदानित आदिवासी आश्रमशाळा संघटनेचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष प्रमोद साळवे, कार्यवाह मनोज आत्राम उपस्थित होते.

# स्वराज्य गणेशोत्सव मंडळातर्फे नेपाळ पूरग्रस्तांना देणार मदत निधी

**'नवसाला पावणारा अंबाझरीचा मोरया'चा १२ सप्टेंबरला भव्य आगमन सोहळा**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अंबाझरी परिसरातील गणेशभक्तांचे श्रद्धास्थान बनलेल्या स्वराज्य गणेशोत्सव मंडळाच्या 'नवसाला पावणारा अंबाझरीचा मोरया २०२६'चा भव्य आगमन सोहळा शनिवार, १२ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता लक्ष्मी भवन चौक येथे आयोजित करण्यात आला आहे.

सामाजिक बांधिलकी जपत मंडळाने नेपाळमध्ये आलेल्या पूरस्थितीमुळे बाधित झालेल्या नागरिकांच्या मदतीसाठी स्वराज्य गणेशोत्सव मंडळातर्फे मदत निधी देण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत स्वराज्य मंडळाचे अध्यक्ष पृथ्वीराज सपकाळ यांनी दिली.

गणेशोत्सवात डीजे लावण्यात येणार नसून नियमांच्या चौकटीत राहून ढोलताशा वादनाने मोरयाचे स्वागत करण्यात येणार आहे, असेही ते म्हणाले.



यंदाच्या उत्सवाचे प्रमुख आकर्षण २० फूट उंचीची भव्य गणेशमूर्ती असणार आहे. मूर्तिकार सचिन चव्हाण यांनी ही मूर्ती साकारली आहे. यावर्षी सजावटीसाठी छत्रपती शिवाजी महाराजांची थीम ठेवण्यात आली आहे. १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता लक्ष्मी भवन चौकातून गणरायाच्या भव्य आगमनाला सुरुवात होईल. मोरयाच्या स्वागतासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात विविध पथके सहभागी होणार आहेत. यामध्ये शिव मुद्रा ढोल-ताशा व ध्वज पथकाचे सुमारे २०० वादक सहभागी होऊन अंबाझरीच्या मोरयाला मानवंदना अर्पण करणार आहेत.

आगमन जल्लोष यात्रेदरम्यान विशेष फायरवर्क्स शो देखील आयोजित करण्यात आला आहे. आगमन सोहळ्यानंतर अंबाझरी हिल टॉप, नागपूर येथे गणरायाची विधिवत स्थापना करण्यात येणार आहे.

स्वराज्य मंडळाची स्थापना २०२३ मध्ये झाली असून, स्थापनेपासूनच मंडळाला परिसरात 'जेन झी मंडळ' म्हणून विशेष ओळख मिळाली आहे. मंडळात मोठ्या संख्येने युवकांचा सहभाग असून, बहुतांश सदस्य महाविद्यालयीन विद्यार्थी आहेत. युवकांचा उत्साह, ऊर्जा आणि कल्पकतेच्या माध्यमातून गणेशोत्सव साजरा करण्याची मंडळाची परंपरा आहे.

अंबाझरी परिसरातील नागरिकांची श्रद्धा आणि गणरायाबाबतचे वैयक्तिक अनुभव यामुळे या गणरायाला 'नवसाला पावणारा अंबाझरीचा मोरया' हे नाव मिळाले. भाविकांच्या मनातील श्रद्धेमुळे अल्पावधीतच हा गणराय परिसरात लोकप्रिय झाला असून, दरवर्षी भाविकांची संख्या वाढत आहे.

पत्रकार परिषदेला स्वराज्य मंडळाचे अध्यक्ष पृथ्वीराज सपकाळ तसेच मंडळाचे पदाधिकारी रोहन चरडे, सूरज वानखेडे, श्रेयश कुंभलकर, जनक मालविया, मंथन बावने, ओमकार गोतमारे, विश्वराज सपकाळ आणि सौम्य देशमुख उपस्थित होते.

## सिरसी येथे बैलपोळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा

**बाजार समिती संचालक धनराज मागरुडकर, उपसरपंच अतुल नारनवरे व राजकीय नेत्यांची प्रमुख उपस्थिती**

**दै. सिंहवाणी वृत्त, सिरसी**

ग्रामीण संस्कृतीचा आणि शेतकरी-सर्जेराजाच्या अतूट नात्याचा प्रतीक असलेला बैलपोळा उत्सव सिरसी (उमरेड तालुका) येथे मोठ्या थाटामाटात आणि उत्साहात पार पडला. यावर्षीच्या पोळा उत्सवाला कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, स्थानिक लोकप्रतिनिधी, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे विशेष शोभा प्राप्त झाली. या सोहळ्याला कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक धनराज मागरुडकर, सिरसीचे उपसरपंच अतुल नारनवरे, तसेच प्रमुख राजकीय मंडळी व समाजधुरीण मुकेश झाडे, किशोर झाडे, माणिक मेहरकुरे, आणि राजू फटिंग यांनी आवर्जून हजेरी लावली. मान्यवरांनी मिरवणुकीच्या ठिकाणी पोहोचून बळीराजाच्या सर्जा-राजाचे दर्शन घेतले, बैलजोड्यांचे पूजन केले आणि उपस्थित सर्व शेतकऱ्यांना पोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

**बैलांचे पूजन व औक्षण :** शेतकऱ्यांनी आपल्या बैलजोड्यांना अंघोळ घालून, बाशिंग, मोरकी, घुंगुरमाळा व झुल घालून आकर्षकरीत्या सजवले होते. बाजार समिती संचालक धनराज मागरुडकर, उपसरपंच अतुल नारनवरे, मुकेश झाडे, किशोर झाडे, माणिक मेहरकुरे व राजू फटिंग यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी बैलांची पूजा करून शेतकऱ्यांचा सत्कार केला. गावातील मुख्य मारुती मंदिर व चौक परिसरात पारंपरिक वाद्यांच्या गजरात बैलांची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी बाजार समिती संचालक व राजकीय नेत्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधून सणाचा आनंद द्विगुणित केला. बाजार समितीचे पदाधिकारी, ग्रामपंचायत प्रशासन व सर्वपक्षीय नेत्यांच्या एकत्र उपस्थितीमुळे गावात उत्साहाचे व सलोख्याचे वातावरण दिसून आले. बाजार समिती संचालक धनराज मागरुडकर, उपसरपंच अतुल नारनवरे, सर्व राजकीय मंडळी आणि गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे सिरसी येथील यंदाचा बैलपोळा उत्सव अत्यंत शांततेत, आनंदात आणि सोहळापूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# गणेशोत्सवातील ध्वनीनियमांबाबत विदर्भ बॅकस्टेज असोसिएशनचा पुढाकार

**पोलिस आयुक्तांसमोर ४ बेस, ४ टॉपचा लाइव्ह डेमो, सर्व वाद्यांसाठी समान नियमांची मागणी**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर डीजेवरील कडक निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर विदर्भ बॅकस्टेज असोसिएशनने ध्वनिप्रदूषण नियंत्रणासाठी व्यावहारिक आणि संतुलित नियमांची मागणी केली आहे. असोसिएशनच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने गुरुवारी पोलिस आयुक्तांची भेट घेऊन निवेदन सादर केले. प्रशासनाच्या नियमांना विरोध नसून, सर्व प्रकारच्या वाद्ये आणि साउंड सिस्टीमसाठी समान, पारदर्शक आणि वैज्ञानिक पद्धतीने डेसिबलवर आधारित नियम निश्चित करावेत, अशी भूमिका पदाधिकाऱ्यांनी मांडली.

या भेटीतील विशेष बाब म्हणजे असोसिएशनतर्फे '४ बेस आणि ४ टॉप' या मर्यादित साउंड सेटअपचे लाइव्ह तांत्रिक प्रात्यक्षिक घेण्यात आले. पोलिस आयुक्त, वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (एमपीसीबी) अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत साउंड सिस्टीम सुरू करून निर्धारित डेसिबल मयार्देत ध्वनी नियंत्रण शक्य असल्याचे प्रात्यक्षिकातून दाखविण्यात आले. या प्रात्यक्षिकानंतर पोलिस आयुक्तांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना साउंड सिस्टीमची सविस्तर तांत्रिक तपासणी करण्याचे निर्देश दिले.

या प्रात्यक्षिकासाठी असोसिएशनचे ३०० हून अधिक सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते. शिष्टमंडळात अध्यक्ष संदीप बारस्कर, सचिव नंदन गजेंद्रगडकर, तसेच पम्मी भट्टी, निखिल कामडे, किरण घाडोळे, कमलेश भांडेकर आणि अमोल मुंडेकर यांचा प्रमुख सहभाग होता.

**असोसिएशनचे चार प्रमुख प्रस्ताव**

**वाद्य नव्हे, डेसिबल ठरावा आधार :** केवळ डिजिटल साउंड सिस्टीम किंवा डीजेला लक्ष्य करण्याऐवजी ढोल-ताशा, संदल, ब्रास बँड तसेच अन्य मोठ्या आवाजाच्या वाद्यांनाही ध्वनीच्या तीव्रतेनुसार म्हणजेच डेसिबलच्या आधारावर समान नियम लागू करावेत, अशी मागणी करण्यात आली.

**४ बेस, ४ टॉपला सशर्त परवानगी :** पश्चिम महाराष्ट्रातील काही शहरांच्या धर्तीवर नागपुरातही निर्धारित वेळ आणि डेसिबल मर्यादेचे काटेकोर पालन करण्याच्या अटीवर ४ बेस आणि ४ टॉपच्या नियंत्रित साउंड सेटअपला परवानगी द्यावी, अशी मागणी असोसिएशनने केली.



**लेझर लाइटवर पूर्ण बंदीची पुढाकार :** सामान्य नागरिकांच्या डोळ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत मिरवणुकांमध्ये हानिकारक उच्च तीव्रतेच्या लेझर बीमचा वापर पूर्णपणे बंद ठेवण्याचे लेखी आश्वासन असोसिएशनने दिले. त्याऐवजी दृश्यतेसाठी ८ ते १२ सामान्य फोकस लाइट्सना परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

**शंभर टक्के नियमपालनाची हमी :** प्रशासनाने निश्चित केलेले सर्व नियम आणि वेळेच्या मर्यादांचे काटेकोर पालन करण्याची हमी साउंड ऑपरेटरनी दिली. नियमांचे उल्लंघन सिद्ध झाल्यास कायदेशीर कारवाई आणि दंडाची जबाबदारी स्वीकारण्याची तयारीही पदाधिकाऱ्यांनी दर्शविली.

गणेशोत्सवाची सांस्कृतिक परंपरा आणि नागरिकांची शांतता यामध्ये समतोल साधणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे असोसिएशनने स्पष्ट केले. सर्व वाद्यांसाठी समान डेसिबल निकष लागू केल्यास ध्वनिप्रदूषणावर प्रभावी नियंत्रण ठेवतानाच गणेशोत्सवाची सांस्कृतिक परंपरा आणि उत्साहही कायम ठेवता येईल, अशी भूमिका असोसिएशनने मांडली.

थोडक्यात

## मातीच्या बैलांना साकारत तोंडली शाळेत बैलपोळा उत्साहात



दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी

बैलपोळ्याच्या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथे विद्यार्थ्यांसाठी मातीपासून बैल बनविण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने मातीपासून सुंदर बैल साकारत आपल्या कलागुणांना वाव दिला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी बैलांसाठी चारा खाण्याची चौकट, गोठा, झूल तसेच विविध पारंपरिक सजावटीच्या वस्तू मातीच्या साहाय्याने तयार केल्या. या कृतीतून विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन, शेती आणि पशुधनाचे महत्त्व अनुभवातून समजले.

बैलपोळ्यानिमित्त विद्यार्थ्यांना वर्षभर शेतकऱ्यांसोबत कष्ट करणाऱ्या बैलांविषयी कृतज्ञता, माया, प्रेम आणि जिव्हाळा यांची जाणीव करून देण्यात आली. बैलांचे शेतीतील योगदान आणि त्यांच्या प्रती असलेली आपली जबाबदारी याविषयीही माहिती देण्यात आली. मातीपासून बैल घडविताना विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, कल्पनाशक्ती, हस्तकौशल्य आणि सांस्कृतिक जाणिवांचा विकास झाला. पारंपरिक सणाचे महत्त्व कृतीतून समजून घेत विद्यार्थ्यांनी बैलपोळा उत्साहात साजरा केला. या उपक्रमातून 'मातीशी नाते, संस्कृतीशी नाते आणि कष्ट करणाऱ्या पशुधनाविषयी कृतज्ञता' हा सुंदर संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला.

## जिल्हास्तरीय लॉन टेनिस स्पर्धेत पोरवाल कॉलेज प्रथम!

दै. सिंहवाणी वृत्त, कामठी

क्रीडा व युवक संचालनालय पुणे अंतर्गत आयोजित जिल्हास्तरीय लॉन टेनिस स्पर्धेत कामठी येथील एस के पोरवाल कनिष्ठ



महाविद्यालयाचा विद्यार्थी जिल्हास्तरीय लोन टेनिस स्पर्धेमध्ये विजय मिळवून विभागीय स्पर्धेत प्रवेश मिळविला आहे. ही स्पर्धा ही महानगरपालिका लॉन टेनिस कोर्ट रामनगर येथे संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये विविध शाळेच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी भव्या पोरवाल याने सेमी फायनल मध्ये ३-० ने विराट पांडे माउंट झिलिटरा बेसा, नागपूर येथील विद्यार्थी होता त्याला हरवून फायनल मध्ये प्रवेश मिळविला. फायनलची भिडंत दिल्ली पब्लिक स्कूल लावाचा विद्यार्थी आलोक मिश्राशी याच्यासोबत होती.या मॅचमध्ये फायनल स्कोर हा १०-४ ने सुपर टाई ब्रेक मध्ये भव्या पोरवाल ने विजय मिळविला या विजयासोबतच त्याचे चयन विभागीय स्तराच्या लॉन टेनिस स्पर्धेकरिता झाले. या विद्यार्थ्यार्ला प्रा डॉ मल्लिका नागपुरे यांचे सहकार्य लाभले. कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर स्वप्नील दाहात , उप प्राचार्य व्ही बी वंजारी तसेच पर्यवेक्षक नरेंद्र मेंढे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पुढील विभागीय स्पर्धेकरिता करिता भव्या पोरवालला शुभेच्छा दिल्या.

## शालेय तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत शंकरराव चव्हाण विद्यालय अव्वल



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

प्रकाशनगर वसाहत परिसरतील शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाने शालेय तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत १९ वर्षीय वयोगटातील मुलांच्या कबड्डी संघाने घवघवीत यश संपादन करून अव्वल स्थान प्राप्त केले. क्रीडा संकुल, सावनेर येथे संपन्न झालेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या १९ वर्षीय वयोगटातील मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय खापा कबड्डी संघाला पराजित करून स्पर्धेत अव्वल स्थान प्राप्त केले.

संयोग बावणे (कर्णधार), हर्षल अंजनकर, रणवीर उके,सूरज शिंदे, सिद्धांत मारबते, मयुर न्हाने,आदेश कांबळे, प्रिन्स जयस्वाल या खेळाडूनी भाग घेतला असून क्रीडा प्रमुख प्रवीण साबळे व मार्गदर्शक सचिन कोरडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य गणेश चिखले, पर्यवेक्षक सुरेखा चिखले, चंदकांत गायकवाड सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी संघातील खेळाडूंचे अभिनंदन केले. शंकरराव चव्हाण विद्यालयाचा कबड्डी संघ कामठी तालुक्यातील आजनी येथे होणाऱ्या शालेय नागपूर जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत सावनेर तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

## तान्हा पोळा उत्सवानिमित्त आपली बसची विशेष वाहतूक व्यवस्था

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर शहरात तान्हा पोळा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बहुतांश शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालये बंद राहणार असल्याने दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी आपली बसची वाहतूक रविवार/सुट्टीच्या दिवसाच्या वेळापत्रकानुसार चालविण्यात येणार आहे. तसेच शहरभर होणारे उत्सवाचे कार्यक्रम आणि अपेक्षित प्रवासी गर्दी लक्षात घेता, सायंकाळी ७:०० वाजल्यानंतर (१९:०० वाजता) बस फेऱ्या सोडण्यात येणार नाहीत.

उत्सवादरम्यान प्रवाशांना सुरक्षित व सुरळीत सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही विशेष वाहतूक व्यवस्था परिवहन विभागातर्फे करण्यात येत आहे. त्यामुळे निवेदन आहे की, प्रवाशांनी आपल्या प्रवासाचे नियोजन त्यानुसार करावे आणि सायंकाळी ७:०० वाजण्यापूर्वी आपली बस सेवेचा लाभ घ्यावा, असे विभागातर्फे आवाहन करण्यात येत आहे.

# 'मारबत महोत्सव' आज





### मनपातर्फे जय्यत तयारी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर शहराची अतिशय जुनी, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा असणारा 'मारबत महोत्सव' यंदा अत्यंत व्यापक आणि भव्य स्वरूपात साजरा होत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही पिवळी मारबतचे आयोजन तऱ्हाने तेली समाज व काळी मारबतचे आयोजन काली मारबत उत्सव समितीच्या वतीने केले जात आहे. नागपूरच्या या ऐतिहासिक संस्कृतीला केवळ राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून देण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. महोत्सवाच्या अनुषंगाने मनपाच्या अर्थसंकल्पात विशेष तरतूद करण्यात आली असून, नागपूरच्या समृद्ध वारशाचे जतन व संवर्धन करण्याच्या दिशेने मनपा कटिबद्ध आहे, अशी माहिती महापौर निता ठाकरे यांनी दिली.

मारबत महोत्सवाचे आयोजन शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १२. वाजता गांधी पुतळा चौक येथे करण्यात येणार आहे.

महोत्सवाची सुरुवात राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या प्रमुख हस्ते पिवळी व काळी मारबत यांची विधिवत पूजा करून झाली आहे. येत्या ११ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित मारबत महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी मनपाच्या विभाग प्रमुखांवर विशेष जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. शहराच्या विविध भागांत खालील प्रमुख चौकांमध्ये मारबत उत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. मनपाचा मुख्य कार्यक्रम गांधीपुतळा चौक येथे होणार आहे. तर मनपाद्वारे स्वागत गेट, संपूर्ण महोत्सव मार्गाची सजावट, मारबतचे स्वागत, स्वागत मंच आदी व्यवस्था करण्यात येणार आहे.

**मनपातर्फे स्वागत मंच**

पिवळी मारबत कुंभारपुरा चौक, गोळीबार चौक, भारत माता चौक, शहीद चौक व टांगा स्टँड चौक, गांधीपुतळा चौक (मुख्य कार्यक्रम स्थळ), कोतवाली चौक, मस्कासाथ छोटेलाल हलवाई समोर स्वागत मंच उभारण्यात येणार आहे

**आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय मान्यवरांची उपस्थिती**

१४५ वर्षांचे गौरवशाली ऐतिहासिक महत्त्व लाभलेल्या या मारबत महोत्सवाला जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी मनपातर्फे विशेष नियोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाला भेट देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जैस्वाल तसेच परदेशातून वाणिज्य राजदूत, विविध देशांचे प्रतिनिधी, इतर माननीय मंत्री महोदय, सर्व आमदार, खासदार, लोकप्रतिनिधी आणि प्रसिद्ध सिनेअभिनेते उपस्थित राहणार आहेत. यात फ्रान्स, इटली, फिनलंड, नॉर्वे यांच्या वाणिज्य राजदूत यांचा समावेश आहे. तसेच सुप्रसिद्ध दिग्दर्शकसुभाष घई, जय मेहता, सुप्रसिद्ध अभिनेते जॅकी श्रॉफ, आरती वेले, अकुश चौधरी, उमेश यादव संपादक निलेश खरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. विशेषः म्हणजे, नेहरू पुतळा चौकात मा.वाणिज्य राजदूत यांना मिलन बघता यावे याकरीता बिल्डींगवर व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण युसीएनवर केले जाणार आहे.



**मारबत महोत्सवानिमित्त प्रसिद्ध सिने दिग्दर्शक सुभाष घई यांचे गुरुवारी (ता. १०) सायंकाळी नागपुरात आगमन झाले. विमानतळावर नागपूर महानगरपालिकेतर्फे त्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी विधी विशेष समिती सभापती कु. निधी तेलगोटे, नगरसेविका मायाताई हाडे, वर्षा चौधरी, नगरसेवक नागेश मानकर, अशोक शामकुळे, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, विवेक रानडे तसेच दिनेश आचार्य उपस्थित होते.**

# डीजेवर कायमस्वरूपी बंदी आणावी, ज्येष्ठ नागरिकांची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** पारंपरिक वाद्ये आणि सांस्कृतिक उत्सवाच्या चौकटीत ऐवजी ध्वनीवर्धकांच्या वाढत्या स्पर्धेने उत्सवाचे स्वरूप बदलले आहे निर्धारित मयार्दा पेक्षा अधिक तीव्र आवाज आणि कंपण, लेझर बीम लाइट यांच्या वापरामुळे धोका निर्माण होतो. डीजेच्या कर्कश आवाजामुळे नागरिकांच्या वृद्धांच्या छातीचे ठोके वाढतात, घबराहट होते, कानठळ्या बसतात त्यामुळे रुग्ण, लहान मुलं, यांना शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागतो. ध्वनी प्रदूषणामुळे सर्व सामान्यांना विशेषता ! हा आजारी व्यक्तींना मोठा त्रास होतो. ईद, जुलूस, संदल किंवा लग्न कार्यालयामध्ये डीजे आणि उच्च तीव्रतेचे ध्वनीक्षेपक वापरणे टाळावे. उत्सवाचा आनंद साजरा करतांना नागरिकांच्या आरोग्याकडे प्रथम लक्ष द्यायला पाहिजे. उत्सवाच्या नावाखाली चौका चौकात उभारल्या जाणाऱ्या ध्वनी वर्धकांच्या अजस्त्र भिंती आणि कानठळ्या बसविणाऱ्या डीजे च्या आवाजा विरोधात राज्यभरातील नागरिकांचा संताप तीव्र होत आहे. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे आदेश निर्धारित डेसिबल मयार्दा आणि शांतता क्षेत्राचे नियम असतानाही होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाच्या विरोधात कडक कानून बनवुन कायदे कायमची बंदी आणने अति आवश्यक आहे. राज्य डीजे मुक्त करण्यास सर्व नागरिकांनी मागणी तीव्र करावी. नागपुरातील सर्वच ज्येष्ठ नागरिक मंडळांनी या मागणीला पाठिंबा द्यावा. श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक मंडळ श्यामनगर तर्फे सचिव अशोक कातूरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## श्रेयवादासाठी शहर गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्याची पोलीस कोठडीत शिरून आरोपीला धमकी

### खापरखेडा पोलीस ठाण्यातील घटना

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

'सद्रक्षणाय खलनिग्रहाणाय' सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा नाश या ब्रीदवाक्याचा वारसा जपण्यासाठी महाराष्ट्र पोलीस दल ओळखले जाते मात्र नागपूर शहर गुन्हे शाखा परिमंडळ ६ मधील एका कर्मचाऱ्याच्या कृत्यामुळे या ब्रीदवाक्यालाच सुरुंग लागल्याचे चित्र निर्माण झाले आहे गुन्हेगारीवर आळा लावण्याऐवजी स्वतःच्या श्रेयवादासाठी पोलीस ठाण्याच्या लॉकअप मध्ये शिरून आरोपीला धमकी दिल्याचा प्रकार उघडकीस आला असून पोलीस वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. खापरखेडा औष्णिक वीज केंद्र परिसरातील एका खासगी कंपनीच्या गोदामाचे टिन कापून तब्बल २ लाख ३६ हजार रुपयांचे तांब्याचे साहित्य चोरट्यांनी लांबवले होते या प्रकरणी खापरखेडा पोलिसांच्या डीबी पथकाने ७ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा पुनित राजू भगत आणि श्रीकांत बंडू गजभिये या दोन आरोपींना बेड्या ठोकल्या. न्यायालयाने दोन्ही आरोपींना ११ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. यादरम्यान तडीपार आरोपी अक्षय उर्फ डग्गम भोसकर याला शहर गुन्हे शाखा परिमंडळ ६ च्या पथकाने ताब्यात घेऊन ९ सप्टेंबरला खापरखेडा पोलिसांच्या स्वाधीन केले.

वीज केंद्र चोरी प्रकरणातील आरोपींना अटक करून गुन्हा उघडकीस आणल्याचे श्रेय खापरखेडा पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाला मिळाले याच रागातून शहर गुन्हे शाखा परिमंडळ ६ मधील एका कर्मचाऱ्याने थेट खापरखेडा पोलीस ठाण्याच्या लॉकअपमध्ये प्रवेश केला अटकेत असलेल्या पुनित भगत या आरोपीला मेरे सामने सिलेंडर क्यू नही हुवा? तुझे दुसरे केसमें डाल दूँगाबअशी थेट धमकी दिल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. शहर गुन्हे शाखा परिमंडळ ६ मध्ये कार्यरत संबंधित पोलीस कर्मचारी खापरखेडा परिसरात राहत असून शहर गुन्हे शाखेत कार्यरत असल्याचा धाक दाखवून परिसरातील अनेक अवैध धंदेवाल्यांकडून मोठ्या प्रमाणावर वसुली करत असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांकडून समोर येत आहे पोलीस खात्यातील पदाचा असा गैरवापर व अंतर्गत श्रेयवादासाठी पोलीस ठाण्याच्या लॉकअप मध्ये शिरून धमकी देण्याच्या या प्रकारामुळे पोलीस खात्याची नाहक बदनामी होत आहे.

कायदा व सुव्यवस्थेचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्या पोलिसांवर आहे त्यांनीच श्रेयवादासाठी असे गैरवर्तन करणे कितपत योग्य आहे? असा सवाल उपस्थित केला जात आहे या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन निष्पक्ष चौकशी करावी व गुन्हे शाखेतील त्या कर्मचाऱ्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी नागरिक व राजकीय वर्तुळातून केली जात आहे.

# इंधनाची चावडी' नाटकाला तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धेत तृतीय क्रमांक!

### जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मौदाच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

भारतीय विद्या भवन विद्या मंदिर, एनटीपीसी कुंभारी येथे ९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धेत जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मौदा ने सादर केलेल्या 'इंधनाची चावडी' या विज्ञान नाट्याला तृतीय क्रमांक मिळाला आहे.शिक्षण विभाग, पंचायत समिती मौदा यांच्या वतीने आयोजित या स्पर्धेत तालुक्यातील इयत्ता ६ वी ते १० वीच्या एकूण १२ शाळांनी सहभाग घेतला होता.



या कडक स्पर्धेत जनता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'इंधनाची चावडी' या नाटकातून विज्ञानाचा संदेश अतिशय प्रभावीपणे मांडला. त्यांच्या या उत्कृष्ट सादरीकरणाला परीक्षकांनी गौरविले. विद्यार्थ्यांच्या या यशात त्यांचे मार्गदर्शक शिक्षक सचिन मोरया, पायल शहारे, भाग्यश्री लाडे, शरद आमदरे, पराग लिमजे आणि हर्षल कावळकर यांचे मोलाचे योगदान लाभले. शिक्षकांच्या उत्तम मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. हा सोहळा भारतीय विद्या भवनच्या प्राचार्य श्रीमती जानकी मनी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. याप्रसंगी केंद्रप्रमुख डॉ. शिल्पा सूर्यवंशी, राजू आंबीलकर व श्रीमती प्रचिती कातकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.जनता विद्यालयाच्या या यशाबद्दल शिक्षण विस्तार अधिकारी ललिता चामट, संकेत मरसकोल्हे, मुख्याध्यापक अनिल मेश्राम, उप मुख्याध्यापक नामदेव तांबडे आणि गटसाधन केंद्राच्या सर्व विषय साधन व्यक्तींनी तसेच पंचायत समिती मौदाच्या शिक्षण विभागाने विजेत्या विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शक शिक्षकांचे आणि मुख्याध्यापकांचे विशेष अभिनंदन केले आहे.

# संत तुकड्यादास महाराजांच्या निधनाने पंधराखेडी शोकसागरात, गावकऱ्यांचा पोळा सण न साजरा करण्याचा निर्णय

### आज आश्रमात अंत्यसंस्कार

दै. सिंहवाणी वृत्त, पंधराखेडी (ता.सौसर)

आंबाखापा, सरांडी व रघुनाथपूर आश्रमाचे संचालन करणारे संत श्री तुकड्यादास महाराज ऊर्फ 'झंडी वाले महाराज' यांचे गुरुवार, दि.१० सप्टेंबर रोजी रात्री आकस्मिक ब्रह्मलीन होऊन देवगमन झाले. ते ८६ वर्षांचे होते. त्यांचे मूळ नाव पंढरी गणपतराव आसरे असे होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच पंधराखेडी परिसरात शोककळा पसरली असून, महाराजांच्या स्मृतीप्रित्यर्थ गावकऱ्यांनी यंदाचा पोळा सण साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. संत तुकड्यादास महाराज यांनी आपल्या आयुष्यात अध्यात्मासोबतच समाजप्रबोधन आणि ग्रामविकासाच्या कार्याला विशेष महत्त्व दिले.

तांडोबा जंगल परिसरात असलेल्या सरांडी आश्रमात त्यांनी सुमारे १५ वर्षे तपश्चर्या केली. त्यानंतर मागील २० ते २५ वर्षांपासून पंधराखेडी जवळील आंबाखापा आश्रमाचे संचालन करीत होते. महाराजांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा आणि त्यांनी लिहिलेल्या ग्रामगीताचा गावागावांत जाऊन



प्रचार- प्रसार केला. ग्रामगीतेतील विचार समाजापर्यंत पोहोचविताना त्यांनी स्वच्छता, व्यसनमुक्ती, समाजप्रबोधन आणि सामाजिक सुधारणेचे विविध उपक्रम राबविले. स्वच्छ व सुंदर गावासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, समाजात एकोपा निर्माण व्हावा आणि तरुणांनी विधायक मार्गावर वाटचाल करावी, यासाठी त्यांनी सातत्याने जनजागृती केली. पंधराखेडी व परिसरातील नागरिकांशी महाराजांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

अध्यात्मिक मार्गदर्शनासोबतच सामाजिक प्रश्नांवरही ते नागरिकांना मार्गदर्शन करीत. त्यामुळे त्यांच्या निधनाने परिसरातील भाविक, ग्रामस्थ आणि अनुयायांमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. पोळा सण न साजरा करण्याचा निर्णय संत तुकड्यादास महाराज हे गावासाठी श्रद्धेचे आणि प्रेरणेचे स्थान होते. त्यांच्या आकस्मिक निधनाने पंधराखेडी गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुःखाच्या प्रसंगी गावातील सर्व नागरिकांनी एकत्र येत यंदाचा पोळा सण साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी उत्साहात साजरा होणारा पोळा यंदा महाराजांच्या निधनामुळे साधेपणानेही न करता शोक व्यक्त करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतल्याने महाराजांप्रती असलेली ग्रामस्थांची श्रद्धा आणि भावनिक नाते अधोरेखित झाले आहे. शुक्रवारी आंबाखापा आश्रमात अंत्यसंस्कार संत तुकड्यादास महाराज यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आंबाखापा आश्रम येथे अग्निदहन संस्कार करण्यात येणार आहेत. यावेळी परिसरातील भाविक, अनुयायी, ग्रामस्थ तसेच महाराजांवर श्रद्धा असणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

महाराजांनी आपल्या आयुष्यभर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील विचारांचा प्रसार, स्वच्छता आणि समाजसुधारणेचे कार्य केले. त्यांच्या निधनाने पंधराखेडी व परिसराने एक आध्यात्मिक मार्गदर्शक आणि समाजप्रबोधक व्यक्तिमत्त्व गमावले असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.

# 'मारबत उत्सव'- आपली विडंबना दडपण्याचा सत्ताधारी पक्षाचा प्रयत्न

सुनील शिरपुरे
यवतमाळ

प्रत्येक सणाची काही ना काही आख्यायिका असते आणि त्यातून विशिष्ट समुदायाला अथवा विशिष्ट शहराला एक अद्भूत ओळख मिळालेली असते. अशीच काहीशी ओळख मारबत उत्सवापासून नागपूरला मिळालेली आहे. नागपूरचा मारबत उत्सव हा महाराष्ट्रातील विदर्भ भागात पोळ्याच्या दुस-या दिवशी म्हणजेच तान्हा पोळ्याच्या दिवशी साजरा केला जाणारा एक अद्वितीय आणि ऐतिहासिक उत्सव आहे. ही सुमारे १४० ते १४४ वर्षे जुनी परंपरा आहे, जी प्रामुख्याने नागपूरातच साजरी केली जाते. याची सुरुवात १८८१-१८८५ च्या सुमारास तऱ्हाणे तेली समाजाने केली. या उत्सवात पिवळी व काळी मारबत यांचे मोठे पुतळे तयार करून त्यांची मिरवणूक काढली जाते. कृष्णाला मारण्यासाठी आलेल्या पुतना मावशीचे प्रतीक म्हणून 'काळी मारबत' तर लोकांचे रक्षण करणाऱ्या शक्तीचे प्रतीक म्हणून 'पिवळी मारबत' मानली जाते. समाजातील वाईट चालीरीती, अंधश्रद्धा, रोगराई, महागाई आणि अनिष्ट प्रवृत्ती दूर जाव्यात यासाठी "इडा-पीडा घेऊन जा गे मारबत" असा नारा देत हा उत्सव साजरा होतो. एकूणच इडा-पीडाचे निरोपण होते. मारबतीच्या बरोबरीने चालू घडामोडी, राजकीय विडंबन आणि सामाजिक समस्यांवर भाष्य करणारे 'बडग्या' नावाचे पुतळेही मिरवणुकीत रांगेत फिरवले जातात आणि शेवटी त्यांचे दहन केले जाते.

रसाळ संत्री, झिरो माईल, दीक्षाभूमी आणि वाघ अशी शहराची ओळख सांगणारी अनेक वैशिष्ट्ये डोळ्यासमोर येतात. मात्र नागपूरच्या सांस्कृतिक ओळखीचा अनोखा भाग म्हणजे मारबत-बडग्यांची मिरवणूक. धार्मिक आणि सांस्कृतिक मिरवणुका देशभरात पाहायला मिळतात. मात्र वाईट प्रवृत्ती, सामाजिक अनिष्ट रूढी-परंपरा तसेच ब्रिटिश सत्तेविरोधातील भावना प्रतीकात्मक पद्धतीनं व्यक्त करणारा मारबत उत्सव नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासात विशेष स्थान राखतो. राज्यविकास पर्यटन मंडळाने मान्यता दिलेल्या नागपूर शहराने वर्षानुवर्षे मारबत मिरवण्याची परंपरा जपली आहे आणि त्यामुळे संपूर्ण देशातील मारबत मिरवणुकीच्या वेगळेपणासाठी नागपूर हे शहर ओळखले जाते. मारबत उत्सव म्हणजे नागपूर शहराला लाभलेला ऐतिहासिक वारसा. नागपूरमध्ये दरवर्षी बैल पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी पिवळी व काळी मारबत तसेच बडग्याची भव्य मिरवणूक धूमधडाक्यात काढली जाते. काळ्या मारबतीची सुरुवात १८८० मध्ये, तर पिवळ्या मारबतीची सुरुवात १८८४ मध्ये झाली होती. देशविदेशात चर्चा व वेगळी ओळख मिळालेल्या या उत्सवाला जवळपास १४० वर्षांची परंपरा लाभली आहे. संपूर्ण देशात हा उत्सव फक्त नागपूरातच साजरा केला जातो. कोरोना अपवाद वगळता यात कधीच खंड पडला नाही. १८९७ मधील अगदी प्लेगची साथ आणि १९२७ मध्ये दंगे सुरु असतानाही हा उत्सव कुठल्याही अडथळ्याविना पार पाडल्या गेला. या अभिनव प्रथेच्या माध्यमातून वर्षभर देशात घडलेल्या चांगल्या-वाईट घटनांवर भाष्य करणारे बडगे (मोठे पुतळे) तयार केले जातात. या वैशिष्ट्यांमुळे शहरातीलच नव्हे तर आजूबाजूच्या राज्यांमधून लाखो नागरिक मारबत मिरवणूक बघण्यासाठी आवर्जून येत असतात आणि या उत्सवाचा आनंद घेतात.

पिवळ्या मारबतीसोबतच काळ्या मारबतीलाही ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. श्री देवस्थान पंच कमिटीतर्फे गेल्या १३५ वर्षांपासून इतवारीस्थित नेहरू पुतळ्यापासून काळ्या मारबतीची मिरवणूक काढली जाते. सगळ्यात पूर्वी अप्पाजी मराठे काळ्या मारबतीचा उत्सव साजरा करत असत. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतावर इंग्राजांचं राज्य होतं. त्यांच्याकडून होत असलेल्या जुलमी कारनाम्यांनी जनता त्रस्त होती. त्यावेळी नागपूरच्या राजघराण्यातील भोसले राजा यांची बहीण बाकाबाईने इंग्रजांशी हातमिळणी केली होती. त्याचा निषेध करण्यासाठी १८८१ पासून काळी मारबत मिरवणूक काढण्यात येत आहे. बाकाबाईच्या नवऱ्यानेपण या तिच्या कृत्याचा विरोध केला नाही. म्हणून त्याचाही पुतळा बनवून सोबतच त्याचीपण मिरवणूक काढतात. इंग्रजांचे राज्य जाऊन आज कितीतरी वर्षे लोटली. परंतु, नागपूरकर आणि या परीसरातील नागरिकांच्या मनात बाकाबाईच्या कुकृत्यामुळे झालेली जखम अजून भळभळतेच आहे. नेहरू पुतळ्याजवळील हनुमान मंदिरात ही काळी मारबत आहे. ब्रिटीश राजवटीत लोक अत्याचाराने त्रस्त होते. परकीय गुलामगिरीचे पाश तुटून देश स्वतंत्र व्हावा, या भावनेने १८८५ मध्ये जागनाथ बुधवारी परिसरात तऱ्हाणे तेली समाजबांधवांनी पिवळी मारबत उत्सव कमिटीची स्थापना केली. ती परंपरा आजही सुरु आहे. या परंपरेला नागपूर शहरात विशेष महत्त्व आहे.



पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी अर्थात तान्हा पोळ्याच्या दिवशी नागपूरात काळी आणि पिवळी मारबत तसेच सामाजिक व राजकीय मुद्द्यांवर भाष्य करणाऱ्या बडग्याची मिरवणूक काढली जाते. देशात फक्त नागपूरातच ही परंपरा असून दरवर्षी नागपूरकर उत्साहात या मिरवणुकीत भाग घेऊन आनंदोत्सव साजरा करतात. काळी व पिवळी मारबत उत्सव समिती व बडग्या उत्सव समितीकडूनच मिरवणुकीसह विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. मात्र यावर्षी प्रथमतः महापालिकेतील सत्ताधारी भाजपने तो साजरा करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे मारबत उत्सव आयोजक समितीकडून हायजॅक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ईडा पिडा घेऊन जा गे मारबत' असा जयघोष करीत तरुण या मारबत मिरवणुकीत सामील होतात. स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मुद्द्यांकडे लक्ष वेधणारे बडगेही या मिरवणुकीत सामील केले जातात. अर्थात अनेक बडगे हे राज्य किंवा केंद्र सरकारच्या धोरणाविरुद्ध असतात. अशावेळी सरकारच्या नावानेही या मिरवणुकीत बोंब ठोकली जाते. सरकारविरोधात एका दिवसासाठी दिलेल्या घोषणांमुळे सत्ताधाऱ्यांविरोधात वातावरण तयार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महापालिकेतील भाजप सत्ताधा-यांनी या महोत्सवासाठी प्रथमच अर्थसंकल्पात तरतूद केल्याने आताच या महोत्सवाला महापालिकेने हातात का घेतले? अशी चर्चा रंगली आहे.

मारबत मिरवणुकीत ८० टक्के तरुणांचा समावेश असतो. नुकताच जंतर-मंतरवरील आंदोलनातून तरुण दूर जात असल्याचे भाजपच्या लक्षात आल्याचे केंद्र सरकारने घेतलेल्या एक विद्यापीठ एक मंत्री संवादाच्या निर्णयातून दिसून येत आहे. त्यामुळे तरुणापर्यंत पोहोचण्यासाठी मारबत महोत्सव उत्तम संधी असल्याने भाजप सत्तेत असलेल्या महापालिकेने हा उत्सव हातात घेतल्याचीही चर्चा यानिमित्त रंगली आहे. सत्ताधाऱ्यांच्या या प्रयत्नातून तरुण भाजपच्या गळाला लागणार काय, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल. आतापर्यंत काळी व पिवळी मारबत उत्सव समिती व बडग्या उत्सव समितीचे पदाधिकारी व्यापारी वर्गाकडून वर्गणी गोळा करून देखणी व आकर्षक मिरवणूक काढत होती. एका लाखापेक्षा जास्त नागरिक यात सहभागी होत असल्याने महापालिकेची भूमिका मिरवणूक गेल्यानंतर रस्ते स्वच्छ करण्याची होती. परंतु यंदा महापौर नीता ठाकरे यांच्या नेतृत्वात सध्या महापालिकेकडून मारबत महोत्सवाची जोरदार तयारी सुरु आहे. महापालिकेच्या स्थायी समिती सभापती शिवानी दाणी यांनी अर्थसंकल्पात या महोत्सवासाठी २ कोटींची तरतूद केली आहे.

हा नागरिकांचा उत्सव असल्याने यात नागरिकांच्या सहभागासाठी महापालिकेला प्रयत्न करावे लागणार नाही. परंतु महापालिकेने या महोत्सवासाठी केंद्रातील मंत्री, देशातील व्यक्तिविशेषच नव्हे तर परदेशातील भारतीयांनाही बोलावण्याचा निर्धार केला असून निमंत्रण दिले जात आहे. आता या महोत्सवाच्या निमंत्रणाला केंद्रीय स्तरावरील नेते, परदेशी पाहुणे किती प्रतिसाद देतात, यावर महापालिकेचे यश अवलंबून राहणार असल्याचे उत्सव समितीतील काहींनी नमूद केले. त्यामुळे महापालिकेला या डावपेचात यश मिळेल का याकडे डोळस नजरेने पाहिल्या जाईल.

१४५ वर्षांची परंपरा असलेल्या मारबत महोत्सवाला प्रथमच महापालिकेने आपल्या हातात घेतले. परंतु यापूर्वी असा प्रयत्न महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने (एमटीडीसी) ने २०१३-१४ मध्ये महोत्सवाला प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली होती.

नागपूरची ही अनोखी संस्कृती देशातील व जगातील पर्यटकांपर्यंत पोहोचावी यासाठी महामंडळाने मारबत महोत्सवाला पर्यटनाच्या नकाशावर स्थान दिले होते. एमटीडीसीने त्यावेळी शहरात केवळ काही बॅनर लावले. मारबत निघते त्या भागात एक मंडप टाकला. एवढाच तोंडदिखाऊपणा एमटीडीसीने त्यावेळी केला. त्यामुळे अनेकांनी नाराजी व्यक्त केली. मुळात मारबत महोत्सव समितीला महामंडळाचा काहीही फायदा झाला नाही. त्यानंतर एमटीडीसीने मारबत महोत्सवाचे कधीही नाव काढले नाही. समाजातील अनिष्ट प्रथा नष्ट करण्याच्या उद्देशाने बैल पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी मारबत मिरवणूक काढण्यात येते. कृष्णाला मारण्यासाठी आलेली पुतना मावशीचे प्रतीक म्हणून काळी मारबत, तर पिवळी मारबत लोकांचे रक्षण करते, अशी आख्यायिका आहे. १८८५ मध्ये तराणे तेली समाजाच्या लोकांनी जागनाथ बुधवारी परिसरात पिवळी मारबत उत्सव समितीची स्थापना करून इंग्रजांच्या दडपशाही आणि अत्याचाराविरुद्ध पिवळी चळवळ सुरु केली. आता मात्र समाजातील सर्व संकटे, रोगराई आणि वाईट प्रवृत्ती दूर पळाव्यात व चांगल्या विचारांचे स्वागत व्हावे यासाठी मारबतीची मिरवणूक काढली जाते. बडग्या हा दरवर्षीच्या चालू घडामोडी, महागाई, भ्रष्टाचार किंवा सामाजिक वाईट प्रवृत्तींचे प्रतीक म्हणून तयार केला जातो. त्याला समाजसुधारणेचे व राजकीय विडंबनाच्या फलकाची जोड असते.

परंपरेनुसार माझे मारबताकडे एवढेच साकडे आहे की, जे नालायक आणि केवळ आपलाच स्वार्थ पाहणारे मंत्री, खासदार, आमदार, अधिकारी, कर्मचारी आणि गाव पातळीवरील लायकी नसलेले, आपलाच फायदा साध्य करणारे आणि लिडरगिरी दाखविणाऱ्या लिडर्सना मारबत घेऊन जावे. बाय चॉन्स त्यांच्या आधी मीच गेलो, तर त्यांच्या उरावर बसल्याशिवाय राहणार नाही एवढे मात्र निश्चित..!

- ७४९८८८५०६१

# इडा-पिडा, महागाई, भ्रष्टाचारी व घोटाळेबाजांना घेऊन जा गे मारबत!

रमेश लांजेवार
नागपूर

नागपूरातील मारबत उत्सव ही देशाच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे. याच उद्देशाने नागपूरच्या १४६ वर्षांचा मारबत-बडग्या उत्सव आता आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याची तयारी नागपूर महानगरपालिकेने केली आहे. याकरीता मनपाने या उत्सवासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद केली आहे ही ऐतिहासिक दृष्ट्या नागपूरकरांसाठी गौरवाची गोष्ट आहे. मारबत उत्सवाची सुरूवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली. यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले.येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली. यानंतर १८८४मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली.आज काळ्या मारबतीला १४६ वर्षे पूर्ण होत आहे तर पिवळ्या मारबतीला १४२ वर्षे पूर्ण होत आहे हा एक इतिहासच म्हणावा लागेल.

दोन्ही मारबती मांडण्या मागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ, भ्रष्टाचार दूर व्हावा.नागपूरसाठी आश्र्चयाची गोष्ट म्हणजे आजही १४६वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने पारपाडल्या जाते. हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची मोठी धरोहर व संस्कृतीच म्हणावी लागेल. कारण या उत्सवात संपूर्ण धमार्चे लोक मोठ्या आनंदाने सहभागी होतात. त्यामुळे ही नागपुरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे. त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पुजा-अर्चना व्हायची आणि आताही होते. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा होतात. असेही सांगण्यात येते की मारबत ही नवसाला पावणारी असल्याची अनेकांची श्रद्धा आहे. मारबतीच्या दर्शनासाठी अनेकजन नवजात शिशूचे तोंड मारबतीच्या स्तनाला लावण्याची देखील प्रथा आहे. त्यामुळे काळ्या मारबतीचा व पिवळ्या मारबतीला पारंपरिक पद्धतीने महत्त्व दिल्या जाते. मारबतीचा सन पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्हया पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढुन येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जय घोष करून "ईडा-पीडा,माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत" अशा घोषणांनी केल्या जाते व संपूर्ण शहरातील नागरिक यात सहभागी होवून संपूर्ण नागपूर दुमदुमते.



मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावस्येला घरोघरी मेड्यांच्या (पळसाचे) फांद्यांची पुजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौका-चौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते "माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत"अशा घोषणा केल्या जातात.माझ्यामते सायंटिफिक दृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या पळसाच्या पानांच्या धुर अवश्य जंतुनाशकाचे कार्य करीत असावे यात दुमत नाही.

कालांतराने या दिवसाला एवढे महत्त्व आले की भ्रष्ट व कलंकित राजनेता किंवा भ्रष्टाचारी यांच्या विरोधात त्याची प्रतीकृती काढून "बडगा" काढून निषेध केला जातो. त्याचप्रमाणे महागाई, अत्याचार, आतंकवाद, महामारी, बॅंक घोटाळे इत्यादींच्या विरोधात बडग्याच्या रूपात प्रतीकृती काढून निषेध नोंदविला जातो.त्याचप्रमाणे यावर्षी पेपर फुटीच्या संदर्भात सुद्धा बडग्या निघेल. यात अनेक सामाजिक संघटना (मंडळ) मोठ्या प्रमाणात सहभागी होतात. पिवळ्या व काळ्या मारबतीच्या रूपाने आज अनेक विघटनकारी शक्तीचा, अत्याचाराचा विरोध करून समाजात जनजागृती करण्याची काळ्या व पिवळ्या मारबतीपासुनच परंपरा मिळाली आहे असे मी समजतो.कारण यामुळे समाजात राजकीय पुढारी, अत्याचारी,भ्रष्टाचारी कोणते घृणास्पद कार्य करतात हे संपूर्ण उघडपणे बडग्याच्या रूपात आपल्याला व देशाला पहायला मिळते व यामुळे समाजात जनजागृती निर्माण होत असते. म्हणजेच मारबत हा सन समाज जागृतीचा मोठा दिवस असल्याचे मी समजतो. कारण यामुळे राजकीय पुढाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पोल-खोल होत असते. आश्चयार्ची गोष्ट म्हणजे १८९७ मध्ये प्लेगची साथ आली होती.त्यानंतर १९२८मध्ये नागपूरात इंग्रजांनी हिंदू-मुस्लिम दंगली घडविल्या तरीही संपूर्ण धर्माच्या समाजबंधवांनी मारबत उत्सवाला कुठेही तडा जाऊ दिली नाही ही नागपूरसाठी व देशासाठी स्वाभिमानाची बाब आहे.त्यामुळे या दोन्ही वर्षी मारबत उत्सवात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाला नाही. परंतु करोना महामारीच्या काळात पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विघ्न निर्माण केले.परंतु करोना महामारी संपुष्टात आल्यानंतर देशातील संपूर्ण धर्माचे सण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरे व्हायला लागले. मुख्यत्वे करून समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मारबत उत्सवात बडग्यांची भुमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविनारे असतात.

यावर्षी मिरवणुकीत आपल्याला अनेक बडगे पहायला मिळेल यात महागाई, सिलेंडरची दरवाढ, पेट्रोल दरवाढ, शहरातील खड्डे, पाकिस्तान, चीन, आतंवाद, घोटाळेबाज, भ्रष्टाचारी, अत्याचारी, बेरोजगारी आणि आता पेपर फुटी इत्यादी घटनेच्या विरोधात शंभरहून अधिक बडगे यावर्षी आपल्याला पहायला मिळु शकते. मारबत उत्सवाची सुरूवात नागपूर मधुन झाली.परंतु आता मारबत उत्सव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात साजरा केल्या जातो.आज मारबत उत्सवाच्या निमित्ताने देशात होणारे अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महागाई, वाढता भ्रष्टाचार यांचा विरोधात समाजाने एकत्रित येण्याच्या उद्देशाने देशातील अनेक राज्यांनी नागपुरची परंपरा अंगीकारून समाजात सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार देशातील १४५ कोटी जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहावा या उद्देशाने मारबत उत्सवाच्या दिवशी प्रतिकात्मक पुतळ्याचे बडगे काढून विरोध प्रगट केल्या जातो.

यामुळे सुध्दा समाजात जनजागृती होतांना आपण पहातो. देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला इतके पोखरून टाकले आहे की इंग्रजांनी देशाला लुटले खरे,परंतु देशातील भ्रष्ट नेत्यांनी देशाला हजार पटीने लुटले आहे. यांच्यामुळे देशात महागाईचा, बेरोजगारीचा व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा डोंगर उभा झाला आहे. याचे प्रायश्चित्त देशातील १४५ कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे व गरीबांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत!

- ९९२१६९०७७९

# ढोल-ताशांच्या गजरात मेंढल्यात बैल पोळ्याचा जल्लोष!

## आंब्याच्या तोरणाखाली सजले बैल, विधिवत पूजेनंतर पुरणपोळीचा नैवेद्य, पारंपरिक तोरण तोडून पोळ्याची सांगता



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील मेंढला येथे शेतकरी बांधवांच्या जिव्हाळ्याचा आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीची ओळख असलेला बैल पोळा सण मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. गावातील बाजार चौकात पारंपरिक पद्धतीने भरलेल्या पोळ्याला ग्रामस्थ, शेतकरी आणि नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. ढोल-ताशांच्या गजरात बैलांची मिरवणूक काढण्यात आल्याने संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पोळ्यानिमित्त बैलांना रंगीबेरंगी सजावट करून सकाळपासूनच त्यांची पूजा व आरतीची तयारी करण्यात आली होती. सजविण्यात आलेले सर्व बैल प्रथम गावातील हनुमान मंदिरात नेण्यात आले. तेथे दर्शन व पूजा केल्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात वाजत-गाजत बैलांना बाजार चौकात आणण्यात आले.

भालचंद्र जनार्दन चरपे व विठ्ठल पांडुरंग सातपुते यांच्या घरून पारंपरिक गुढी व आरती वाजत-गाजत बाजार चौकात आणण्यात आली. त्यानंतर पोलीस पाटील गजानन इंगळे व विधी पंडित अरुण पोहरकर यांच्या हस्ते बैलांची विधिवत पूजा करण्यात आली. बैल हा शेतकऱ्याच्या शेतीकामातील महत्त्वाचा साथीदार असल्याने पोळा सणाला ग्रामीण भागात विशेष महत्त्व आहे. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत नागरिकांनी या पारंपरिक सोहळ्याचा आनंद घेतला. दरम्यान, पोळ्याच्या पारंपरिक विधींची सांगता बाजार चौकातील आंब्याचे तोरण बैलांकडून तोडण्यात आल्यानंतर झाली. तोरण तोडण्याचा क्षण पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. या पारंपरिक सोहळ्याने मेंढला येथील बैल पोळ्याची उत्साहात सांगता झाली. पोळा सणाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विनोद जांभळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे पोळा उत्सव शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# विदर्भातील बालोत्सव: तान्हापोळा

**एन. के. कुमार गुरूजी**
**गडचिरोली**

पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी लहान मुले आजही लाकडाचा किंवा मातीचा लहान नंदीबैल सजवून त्याची मिरवणूक काढतात. नंदीबैलांना रंगवणे, तोरण-फुलांनी सजवणे, त्यांना आकर्षक बनवणे ही कामे सणाच्या कितीतरी दिवस आधीपासूनच करण्यासाठी त्यांची लगबग सुरू असते. ज्या दिवशी तान्हा पोळा असतो त्या दिवशी ही बच्चेकंपनी आपापले नंदीबैल घेऊन शेजारी तसेच ओळखीच्या लोकांच्या घरी जातात. तेथे पोळा मागितला जातो. मग त्या नंदीबैलाला व नंदीबैल धारकाला ते ओळखीतले कुटुंब ओवाळून खाऊ आणि पैसे देतात. तोंड गोड करतात. काही ठिकाणी या लाकडी नंदीबैलांचा भव्यदिव्य मेळावा भरतो. तसेच अनेक ठिकाणी या लहान मुलांसाठी नंदीबैलांची सजावट आणि स्पर्धा आयोजित करण्यात येतात.

एक कृषिप्रधान देश आहे. महाराष्ट्रात व त्यातल्या त्यात विदर्भात पोळा हा एक शेतकऱ्यांचा मोठा सण आहे. त्या दिवशी बैलांना कामकाजापासून सुट्टी असते. त्या दिवशी बैलांना न्हाऊ-माखू घालतात. त्यांना गोड पुरणपोळीचे जेवण घालतात, त्यांना सजवतात व मिरवतात. त्या दिवशी त्यांची घरोघरी पूजा होते. लहान मुले मोठे बैल नेऊ शकत नाहीत. ते त्यांना आवरू पण शकत नाहीत. म्हणून त्यांच्या हौस-मजेसाठी तान्हापोळा साजरा करण्यात येतो. त्या दिवशी लहान मुले माती किंवा लाकडापासून तयार केलेला नंदीबैल घेऊन खऱ्या बैलाप्रमाणेच या नंदीबैलांचा तान्हापोळा साजरा करतात. नागपूरकर भोसल्यांच्या शासनकाळात हा सण सुरू झाला. विदर्भात बहुधा सर्व ठिकाणी हा सण साजरा होतो. विदर्भात पोळ्याचा सण उत्साही वातावरणात व मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. येथील अनेक ठिकाणी बैलपोळा या सणाच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा सण म्हणजे तान्हापोळा होय. हा सण म्हणजे बालगोपाळांचा सण- बालोत्सव



असतो. कारण लहान मुले मोठे बैल नेऊ शकत नाही किंवा व्यवस्थित सांभाळू शकत नाही. बैलांना आवरणे त्यांना कठीण जाते. तान्हापोळा हा सण साजरा करण्यामागेही इतिहास आहे-

सन १८०६च्या काळात नागपुरात रघुजी राजे भोसले द्वितीय हे येऊ घातलेल्या पोळ्याची तयारी करत होते. शेती आणि शेतकरी हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. शेतीकडे ते एक व्यवसाय म्हणून नव्हे तर परंपरा आणि संस्कृती म्हणून पाहत होते. ही परंपरा नव्या पिढीने देखील जोपासली पाहिजे, असा त्यांचा आग्रह असायचा. यातूनच तान्हापोळा या सणाचा जन्म झाला. रघुजी राजे भोसले द्वितीय हे दूरदृष्टी असलेले लोकांचे नेते असल्यामुळे त्यांनी नवीन पिढ्यांना शेती व शेतीशी जुळलेले बैल यांच्याप्रती आस्था व रुची वाढावी, म्हणून तान्हापोळा सुरू केला.

श्रावण अमावस्येला साजरा होणाऱ्या मोठ्या बैलांच्या पोळ्यात लहान मुलांचा जास्त संबंध येत नाही. ते फक्त बघतच असतात. यातून महाराजांना एक कल्पना सुचली आणि ती त्यांनी लगेच अमलात आणली. लहान मुलांना मोठा व खराखुरा बैल सांभाळणे कठीण असते म्हणून त्यांनी लाकडाचा बैल तयार करून घेतला. या लाकडी बैलांना चाके लावली. मोठ्या बैलांचा जसा पोळा सण साजरा करतात, तसाच हा उत्सव सुरू केला. बैलांची वाजतगाजत मिरवणूक काढली. मोठ्या पोळ्यातील सर्व गोष्टी या तान्ह्यापोळ्यात सुरू केल्यात. बैलाची पूजा झाल्यावर पोळा फुटला, अशी दवंडी दिली जायची.

हा सण लहान मुलांसाठी असल्यामुळे महाराज त्या मुलांना मिठाई व इतर भेटवस्तू देत. भोसले चौफेर असले तरी तान्हापोळा नागपूरकर भोसलेच साजरा करतात. पशुप्रेमाची पूवार्पार परंपरा विद्यमान मुधोजी राजेंनी जपली. त्यांच्या संग्रहात आजही उमदे घोडे, राजहंस, विविध पक्षी व प्राणी आहेत.

नागपुरात तर पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी मारबत आणि बडग्याचा उत्सव असतो. समाजातील वाईट चालीरीती आणि रोगराई दूर करण्याचे साकडे मारबतीला घालण्यात येते. या उत्सवात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मुद्दे आणि स्थानिक समस्या यावर भाष्य करणारे फलक असतात. ही परंपरा सन १८८१पासून सुरु झाली. मारबत आणि बडगा हा जगातील एकमेव असा मिरवणूक प्रकार फक्त नागपुरातच आहे.

आता तर काळी मारबत व पिवळी मारबत तयार करतात आणि त्यांची मोठ्या धुमधडाक्यात मिरवणूक काढतात. विदर्भात नागपूर आणि आसपासच्या सर्व भागात तान्हापोळा साजरा केला जातो. बैलपोळा आणि तान्हापोळा असे दोन सण दोन दिवस साजरे केले जातात. शेतीची आणि पशुधनाची असलेली बांधिलकी व कृतज्ञता जपण्याचा प्रयत्न केला जातो. परंपरा आणि संस्कृती जपली जाते. म्हणूनच विदर्भातील पोळा सण वैशिष्ट्यपूर्ण आणि आगळावेगळा ठरला आहे.

- ९६९९८३६७१७

# बल्लारपुरात पहिले जिल्हा आरोग्य साहित्य संमेलन : आशा स्वयंसेविकांचा सन्मान




**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर- धनंजय पांढरे**

आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा आजार होऊ नये यासाठी समाजाची जीवनपद्धती बदलणे अधिक गरजेचे आहे. व्यसनाधीनतेचा वाढता विळखा, बदलती जीवनशैली आणि पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर होत आहे. त्यामुळे आरोग्य हा केवळ व्यक्तीचा विषय न राहता संपूर्ण समाजाचा विषय बनला पाहिजे. त्यासाठी महाराष्ट्रात आरोग्य स्वराज्य ही व्यापक लोकचळवळ उभी करण्याची आवश्यकता आहे, असे मत ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग यांनी व्यक्त केले.

बल्लारपूर येथील गोंडराजे खांडक्या बल्लाळशाह नाट्यगृहात पहिल्या जिल्हा आरोग्य साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.बल्लारपूर पंचायत समिती आणि फिनिक्स साहित्य व सांस्कृतिक प्रतिष्ठान, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. बंग यांनी आरोग्य व्यवस्थेसह सामाजिक आणि पर्यावरणीय प्रश्नांवर भाष्य केले.

मानवी आयुष्यमान वाढविण्यात विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाने मोठी भूमिका बजावली आहे. बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यातही यश मिळाले आहे. मात्र, आयुष्याची वर्षे वाढण्याबरोबरच ती निरोगी राहणे आवश्यक आहे. सध्याच्या जीवनशैलीत बदल न झाल्यास दीघार्युष्याचा अपेक्षित फायदा मिळणार नाही, असे डॉ. बंग यांनी स्पष्ट केले.

व्यसनाचा प्रसार समाजासाठी गंभीर आव्हान ठरत असून त्याची तुलना त्यांनी प्लेगसारख्या वेगाने पसरणाऱ्या संकटाशी केली. या संकटाचा सामना केवळ शासन किंवा आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून होणार नसून नागरिकांच्या सक्रिय सहभागातूनच त्यावर प्रभावीपणे मात करता येईल, असे त्यांनी सांगितले.

मानवी आरोग्याचा थेट संबंध निसगार्शी असल्याचे नमूद करताना जल, जंगल आणि जमिनीचे संवर्धन करण्याचे आवाहनही डॉ. बंग यांनी केले. पर्यावरणाचे आरोग्य बिघडले तर त्याचा परिणाम थेट मानवी आरोग्यावर होतो. त्यामुळे आरोग्यविषयक चळवळीला पर्यावरण संवर्धनाची जोड देणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. नगराध्यक्ष डॉ. अलका वाढई यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी आशा स्वयंसेविकांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच गोपाल शिरपूरकर लिखित 'लंकापर्व' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाला स्वागताध्यक्ष तथा गटविकास अधिकारी धनंजय साळवे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी कल्पना क्षीरसागर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, तहसीलदार रेणुका कोकाटे, डॉ. प्रशिक वाघमारे, नरेशकुमार बोरीकर, डॉ. संदेश मामीडवार, डॉ. आशा साळवे, डॉ. अश्विनी कांबळे, महिला व बालविकास अधिकारी शुभांगी वहऱ्हाटे आणि गटशिक्षणाधिकारी सचिन माळवी उपस्थित होते. संचालन अविनाश पोईनकर यांनी केले, तर मेघा बलकी यांनी आभार मानले.

# रघुवंशी कॉम्प्लेक्सला आगीचा विळखा, मेडिकल एजन्सीचे कोट्यवधींचे नुकसान

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

शहराच्या मध्यवर्ती भागातील रघुवंशी कॉम्प्लेक्समध्ये इंडियन मेडिकोज एजन्सीच्या तीन स्टोरेज रूमला बुधवारी पहाटेच्या सुमारास भीषण आग लागल्याने एकच खळबळ उडाली. आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केल्याने मोठ्या प्रमाणात औषधी व वैद्यकीय साहित्य जळून खाक झाले. प्राथमिक माहितीनुसार, या दुर्घटनेत कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. पहाटे सुमारे ३ वाजताच्या सुमारास आग लागल्याचे समोर आले. आगीची तीव्रता लक्षात घेता अग्निशमन दलाच्या अनेक बंबांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले.

तब्बल ३० ते ३५ अग्निशमन वाहनांच्या मदतीने आग नियंत्रणात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात आले. मात्र, सायंकाळी सहा वाजेपर्यंतही आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यासाठी




अग्निशमन दलाची धडपड सुरू होती.

इंडियन मेडिकोज एजन्सीचे मालक आकाश पाजनकर व कमलेश पाजनकर असल्याची माहिती आहे. कॉम्प्लेक्समधील तीन स्टोरेज रूममध्ये मोठ्या प्रमाणात औषधे व वैद्यकीय साहित्य साठवण्यात आले होते. आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने हे संपूर्ण साहित्य जळून खाक झाले. तसेच एजन्सीच्या काउंटरमध्ये ठेवलेली सुमारे सहा लाख रुपयांची रोकडही आगीत जळाल्याची माहिती समोर आली आहे. आगीचे नेमके कारण स्पष्ट झाले नसले तरी प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

रघुवंशी कॉम्प्लेक्सच्या तिन्ही बाजूंनी अग्निशमन वाहनांना थेट प्रवेश मिळण्यास अडचणी निर्माण झाल्या. परिसरातील अरुंद जागेमुळे अग्निशमन दलाला मोठी कसरत करावी लागली. एका छोट्याशा गल्लीतून पाईप टाकून आगीवर पाण्याचा मारा करण्यात आला. त्यामुळे आग विझविताना अग्निशमन कर्मचाऱ्यांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले.

**दुकाने आणि रहिवासी भागालाही धोका**

कॉम्प्लेक्समध्ये विविध व्यावसायिक प्रतिष्ठाने असून त्यामध्ये मोबाईल दुकाने, कपड्यांची दुकाने यांसह इतर व्यवसाय आहेत. आग आणखी पसरली असती तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. त्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या घटनेनंतर रघुवंशी कॉम्प्लेक्समधील अग्निसुरक्षा, आपत्कालीन मार्ग आणि पार्किंग व्यवस्थेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. कॉम्प्लेक्सच्या तिन्ही बाजूंनी अग्निशमन वाहनांना पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने आपत्कालीन परिस्थितीत मोठा धोका निर्माण होऊ शकतो, अशी चर्चा परिसरात सुरू आहे. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील व्यापारी संकुलांची अग्निसुरक्षा आणि बांधकाम नियमांची तपासणी प्रशासनाकडून केली जाणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# गणेशोत्सव अन् पोळा सणाच्या पार्श्वभूमीवर सीर्सीत पोलीस प्रशासनाचे दंगल नियंत्रण प्रात्यक्षिक व रूट मार्च

## कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी बेला पोलिसांचे शक्तीप्रदर्शन, नागरिकांमध्ये सुरक्षेची भावना



**दै. सिंहवाणी वृत्त, सीर्सी**

आगामी पोळा, श्री गणेश स्थापना आणि विसर्जनोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने पोलीस स्टेशन बेलाच्या वतीने सीर्सी येथे भव्य मॉक ड्रिल (दंगल नियंत्रण प्रात्यक्षिक) व रूट मार्चचे आयोजन करण्यात आले. पोलीस स्टेशन बेलाचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक (सपोनी) उमेश नासरे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी सायंकाळी ४:३० ते ६:०० या वेळेत सीर्सी बाजार चौक येथे हे प्रात्यक्षिक पार पडले. यानंतर आखाडा चौक ते मेडिकल चौक आणि बस स्टॉप चौकापर्यंत पोलिसांचा मुख्य मार्गावरून रूट मार्च काढण्यात आला.

सण-उत्सवाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मुख्य विसर्जन मार्गावर मॉब-डिस्पर्सल (जमाव पांगवणे) व दंगल नियंत्रणाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले. दंगलसदृश परिस्थिती निर्माण झाल्यास त्यावर नियंत्रण कसे मिळवायचे, याचा तालीम सराव पोलीस कर्मचाऱ्यांनी यावेळी केला. या मॉक ड्रिल व रूट मार्चमध्ये बेला पोलीस स्टेशनचे २ अधिकारी, १५ पोलीस अंमलदार, आरसीपी पथकाचे २६ जवान लाठी, ढाल व हेल्मेटसह पूर्ण गणवेशात सहभागी झाले होते. सोबतच ५ होमगार्ड जवानही या कारवाईत तैनात होते. सदर उपक्रमाच्या वेळी अस्लम नवगाबंदे, अमोल कोटेवार, सोनू चाटप, अमोल काळे यांच्यासह स्थानिक नागरिक व पोलिसांची उपस्थिती होती. पोलिसांच्या या शिस्तबद्ध रूट मार्चमुळे सीर्सी परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# स्थानिक आमदारांना मंचावरून शिवीगाळ, स्थानिक राजकारण तापले

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

९ सप्टेंबर रोजी शहरातील नगर परिषद हायस्कूल सावनेर च्या पटांगणावर सावनेर कल्चरल असोसिएशन द्वारे सायंकाळी ७ वाजता दहिहंडी चे आयोजन केले होते. आयोजनात प्रखर हिंदुत्ववादी टी.राजि सिंग ठाकूर प्रामुख्याने उपस्थित राहणार होते.

टी राजासिंह ठाकूर यांना आयोजकांनी मोठ्या जनसमुहाच्या उपस्थिती होणार असल्याचे सांगून आमंत्रित करण्यात आले होते परंतु जमिनी वस्तूस्थिती वेगळीच होती. आयोजन स्थळावर दोन तीन हजारांहून कमी उपस्थिती मुळे उपस्थिती वाढेल व साहेबांना बोलावू या नादात आयोजकांची तारांबळ उडू लागली व आयोजनाचा निर्धारित वेळ निघू लागला अश्यात आयोजकांच्या विनंतीवरून ९.३० च्या दरम्यान टि राजा सिंह यांचे आगमन झाले व आयोजकात अती उत्साह संचारला.

व आपल्या प्रास्ताविक भाषणात आयोजक प्रमोद ढोले यांचा स्वताःवःण ताबा सुटला व त्याच्या स्थानिक आमदार, नगराध्यक्ष, नगरसेवक व समाजसेवींना सदर आयोजनात अडथडा निर्माण करण्याचा आरोप करत शिवीगाळ करु लागल्याने लगेच वातावरण तापू लागले व मंचावर दोन मिनिटं आधी आलेले प्रखर हिन्दूत्ववादी नेते टि. राजासिंह यांनी काढता पाय घेत मंचावरून निघून गेले.

सदर आयोजनात क्षेत्राचे आमदार डॉ. आशिषबाबू देशमुख, नगराध्यक्षा, नगरसेवक व समाजसेवी यांना शिवीगाळ केल्याने भारतीय जनता पक्षाचे मंडळ प्रभारी व नगरसेवक मंदार मंगळे, भारतीय जनता पक्षाचे नागपुर जिल्हा उपाध्यक्ष रामराव मोवाडे,सावनेर नगर पालिकेचे उपाध्यक्ष राजु घुगल, पाणीपुरवठा सभापती महेश चकोले सह शेकडो भाजप कार्यकर्ते यांनी पोलीस स्टेशन गाठून प्रमोद ढोले यांच्या विरोधात तक्रार दाखल करुन कायदेशीर कडक कारवाईची मागणी केली आहे.

**प्रमोद ढोले यांची भाजपमधून हकालपट्टी**

भारतीय जनता पक्षाचे नागपुर जिल्हा (काटोल) अध्यक्ष मनोहर कुंभारे यांनी प्रसिद्धी पत्रकातुन स्पष्ट केले आहे की प्रमोद ढोले, राह. सावनेर बसस्थानका मागे, सावनेर हे भारतीय जनता पार्टीचे सक्रीय सदस्य नसून त्यांचा भारतीय जनता पाटीर्शी काहीही सबंध नाही. त्यांची भारतीय जनता पार्टी विरोधी असलेली विचार धारणा व वर्तणुक ही पुर्णपणे पक्ष विरोधी असल्याने त्यांना आज दिनांक १० सप्टेंबर रोजी मी मनोहर शंकरराव कुंभारे, जिल्हाध्यक्ष, नागपुर जिल्हा काटोल (ग्रामिण) माज्या अधिकाराने प्रमोद ढोले यांची भारतीय जनता पार्टीतून तात्काळ हकालपट्टी करीत आहे.



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि कांचन गडकरी यांनी धापेवाडा येथील घरी शेतातील बैलांची पूजा करून सहपरिवार पोळा साजरा केला.

# कै. मनोहर कवीश्वर लिखित "गीत मनोहर "चा उद्या प्रयोग

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर** - महाराष्ट्रातील त्यातही मुख्यत्वेकरून विदभार्तील गाजलेले कवी आणि गीतकार कै. मनोहर कवीश्वर यांची अत्यंत गाजलेली कलाकृती म्हणजे "गीत गोविंद".भगवान श्रीकृष्णाच्या चरित्रावर आधारित हा गीतसंगीतमय कार्यक्रम विस्मरणात जावू नये म्हणून पुणे येथील "कलाविधान" या संस्थेने २५ वर्षांच्या कालावधीनंतर या कार्यक्रमाचे "गीत मनोहर" या नावाने पुनरुज्जीवन केलेले आहे. " गीत मनोहर" या शीर्षकाखाली होणारा हा काव्य -संगीत - अभिवाचनाचा कार्यक्रम शनिवार,दिनांक १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सिव्हिल लाईन्स मधील चिटणवीस सेंटरच्या बनयान सभागृहात होईल. आल्हाद आळशी, आलोक आळशी,मृण्मयी जोशी,अश्विन चितळे,सृजन कथलकर, सौमित्र क्षीरसागर, पार्थ ताराबादकर,आदित्य आपटे, सिद्धी देशपांडे,वेधा पोळ आणि रिया पितळे या कलावंतांचा कार्यक्रमात सहभाग आहे. हा कार्यक्रम निःशुल्क आहे.